दातार-कुल-वृत्तांत प्रसिद्धीचे सहर्ष स्वागत !

डायमंड मोटार सायकल्स
१५३९ सदाशिव पेठ, महाराष्ट्र मंडळ, टिळक रोड पुणे ३०.

卐

युनायटेड एंटरप्रायजेस
सर्व प्रकारच्या स्प्रिंगचे निर्माते
७४ बुधवार पेठ, पुणे २

卐

श्री हरि दुग्धालय
७४ बुधवार पेठ, पुणे २

॥ श्री ॥

# दातार-कुल-वृत्तांत

## प्रास्ताविक

### १. दातार आडनावाची उपपत्ती

शतेषु जायते शूरः । सहस्रेषुच पंडितः ॥
वक्ता दशसहस्रेषु । दाता भवति वा न वा ॥

आडनांव म्हणजे कुळनांव. चित्पावनांत इतरांपेक्षा आडनांवे प्रामुख्याने दिसतात. शिवाय ती धंद्यावरून अगर हुद्यावरूनच पडलेली नसून कशावरून पडली हे अद्याप निश्चित झालेले नाही. "जैसे स्थानी बैसले। तेचि आडनांव पावले। अथवा करणीस्तव झाले। नाना कुळांचे ॥ असे सन १५६५त महालिंगदास या कवीने म्हटले आहे. ह्यावरून राहण्याच्या गांवावरून व कृतीवरून आडनांवे पडल्याची समजूत होती हे उघड दिसते.

दातार हे नाव ह्या दोन्ही प्रकारातून निघाले असे दिसते. देशस्थ ब्राह्मणांत 'कपिलस्' गोत्रांत दातार हे आडनांव आहे. ह्या घराण्याचे मूळ ठिकाण मद्रास इलाख्यातील (हल्लीच्या आंध्रमधील) गुत्ती गावच्या जवळपास 'दातारी' हे खेडेगांव होते. ह्यावरून त्यांना 'दातारी अवरू' (म्हणजे दातारीकर) म्हणत. त्याच नांवाचे संक्षिप्त रूप 'दातार' असे पुढे झाले (भारद्वाज कपिलस वृत्तांत पृ. २८) ह्या आडनांवाचे त्या गोत्रांत एकच घराणे आहे. देशस्थांतील दुसरे एक घराणे भारद्वाज गोत्रांत 'दातार' आडनांवाचे आहे. सोलापूर जिल्ह्यांत बिटले व नरखेड हा त्यांची मूळ गांवे आहेत त्यांना हे नांव कसे मिळाले ह्याची माहिती ह्या घराण्यातील मंडळींना नाही. त्यातील प्रा. अ. अ. दातार, विलिंग्डन कॉलेज, सांगली, यांनी कोकणांतून देशावर आल्यावर या घराण्याचा शरीरसंबंध देशस्थाशी झाला आणि नंतर आम्ही देशस्थ झालो असे कळविले आहे. श्री. वि. श्री. दातार निवृत्त डे. सेक्रेटरी लीगल डिपार्टमेंट महाराष्ट्र यांचे मते ही कल्पना ग्राह्य धरण्यास काही अडचणी आहेत त्या म्हणजे ज्या घराण्यांनी आपले नांव सांभाळून ठेवले ती चित्पावन असून ती देशस्थ म्हणवून घेणार नाहीत. तसेच सध्या कोकणांत अगर देशावर कोठेही भारद्वाज गोत्राचे चित्पावन दातार घराणे नाही. (भा.क. पृ.

१ व ८) दातार हा शब्द संस्कृत 'दातृ' या नामाचे प्रथमेचे अनेक वचन 'दातार:' यावरून आला आहे हे उघड आहे. दातार आडनावाची बहुसंख्य घराणी चित्पावनांत आहेत. काश्यप, वासिष्ठ व शांडिल्य ह्या गोत्रांची दातार घराणी असल्याबद्दल पंचांगातील गोत्रावळीत नमूद आहे. परंतु आमच्याकडे काश्यप गोत्रातील एकाही व्यक्तींचे माहितीपत्रक भरून आलेंले नाही. वासिष्ठ गोत्रांत ऋग्वेदी व यजुर्वेदी (हिरण्यकेशीय) या दोन्ही वेदांची घराणी आढळतात व शांडिल्यात फक्त ऋग्वेदीच आहेत. ह्या घराण्यांना 'दातार' हे नांव ह्यातील कोणातरी मूळ पुरुषाच्या दातृत्व गुणामुळे प्राप्त झाले व तेच त्याच्या पुढील पिढयांनी चालू ठेवले असे दिसते त्याबद्दल वा. हि. घराण्यांतील श्री. ना. वि. दातार (वा. हि पृ १३२) यांनी आपल्या घराण्यात चालत आलेली एक आख्यायिका खालीलप्रमाणे कळविली आहे.

"वितस्ता नदीच्या काठी हरिकूहर म्हणून गांव होते. तेथे सोमदेव-सोमदत्त म्हणून एक ब्राह्मण प्रतिहार (दान) मिळालेल्या चार गावांच्या समूहावर राज्य करीत होता. त्याने शेजारच्या गावांच्या राजावर स्वारी केली. तेव्हा त्या राजाने प्रतिहार देणारे सम्राटाकडे (विक्रमादित्य किंवा समुद्रगुप्त) याचेकडे तक्रार केली असता त्या राजाने प्रतिहार घेणारे ब्राह्मणाने क्षत्रिय वृत्ती धारण करून दुसऱ्यावर स्वारी केली याबद्दल निर्भत्सना केली व शिक्षा म्हणून भोजनप्रसंगी पात्रापुढील दक्षिणा उचलण्यास प्रतिबंध केला. नंतर प्रायश्चित्त म्हणून सोमदेवाने सर्वतोभद्र किंवा तसाच काही यज्ञ करून सर्वस्व दान केले. यज्ञानंतर इंद्र भिक्षेकरता आला असता त्याने सर्वदान केल्याचे सांगितले. त्यावर देवाने अंगावर उत्तरीय शाल असल्याचे दाखविले व त्याची मागणी केली. तेव्हा सोमदेवाने उत्तरीय काढून अर्पण केले. त्यावेळी बर्फ पडत होते त्यामुळे थंडीच्या कडाक्याने सोमदेव मरणोन्मुख झाला असता देवाने त्याला सावध करून उठविले व त्याच्या दातृत्वाबद्दल दातृ (दातार) हे नाव मिळेल असे सांगून देव अंतर्धान पावला त्यानंतर तो प्रदेश सोडून सोमदेव इतरत्र गेला."

दातृत्व गुणामुळे आडनांव बदलल्याचे उदाहरण नाशिकचे प्राचार्य पाटणकर यांनी दिले आहे. त्यांच्या आजोळचे मूळ आडनांव 'दातीर'. ते सावकार होते त्यांनी एक मोठे कर्ज माफ केल्यामुळे त्यांना दातार म्हणू लागले असे त्यांनी लिहिले आहे. संकीर्ण विभाग पृ. २५) 'दातीर' हे काश्यप गोत्री. त्यातील काही घराणीं अशा रितीने 'दातार' झाल्यामुळे दातारांचे गोत्रात 'काश्यप' गोत्र आले असावे.

ह्या प्रकरणाचे आरंभी एक संस्कृत सुभाषित दिले आहे. त्याचा अर्थ शेकडो लोकांमध्ये एखादाच शूर निपजतो, हजारोंत एखादाच पंडित होतो, वक्ता दहा-



हजारात एखादाच असतो आणि दाता असतो वा नसतो म्हणजे दातृत्व गुण दुर्मिळ असतो असा आहे. असा दुर्मिळ गुण ज्या व्यक्तींत प्रकर्षाने आढळला तिला समकालीनांनी 'दातार' असे बहुमानार्थी संबोधावे हे स्वाभाविकच आहे. 'सहस्रबुद्धे' हे अशाच विशेष गुणामुळे पडलेल्या आडनांवाचे उदाहरण आहे. हे गुण अर्थात एकाच घराण्यातील अगर कुलातील व्यक्तींपुरते मर्यादित असणे शक्य नाहीं. म्हणून अशी गुणवाचक आडनांवे ब्राह्मणातील निरनिराळया विभागात इतकेच नव्हे तर इतर समाजातही आढळून येतात. 'दातार' आडनांव घेतले तर ते ब्राह्मणाप्रमाणेच मराठे व वंजारी समाजात आहे असें कळते. शिवाय सौराष्ट्रात 'दातार' आडनांवाची एक मुसलमान जमात आहे आणि गिरनार पर्वताच्या पायथ्याशी 'दातार पीर' म्हणून एक स्थान आहे असे सांगतात. पाश्चात्य देशात (नार्वे स्वीडन येथे) DATTAR हे उपनाम असल्याचे श्री. श्री. वा. दातार (वा. हि. १२७) यांनी कळविले आहे ही उपपत्ति मान्य झाली की चित्पावनांत अनेक गोत्रात आणि ऋग्वेद व यजुर्वेद (हिरण्यकेशीय) या दोन्ही वेदांची 'दातार' घराणी कशी आढळतात याचा सहज उलगडा होतो. आणि ब्राह्मणांत 'दातार' आडनांव असले की ते घराणे चित्पावन किंवा कोकणस्थ असावे अशी समजूत बरोबर नाही व ते घराणे मूळचे कोकणातील की देशावरील हा प्रश्न लागू होत नाही हे उघड होते.

बहुसंख्य दातार घराणी चित्पावनांत आहेत पण चित्पावनांतील मूळच्या म्हटलेल्या ६० आडनांवात 'दातार' नांव येत नाही. या मूळ ६० आडनावांची आता ३००-४०० आडनावे झाली आहेत. प्रत्येक गोत्राची मूळ आडनावे कोणती व त्या प्रत्येकातून नवीन कोणती निघाली याबद्दलची माहिती (आपटे जंत्री) या ग्रंथात पृ. ४०१वर दिली यावरून चित्पावनातील हल्लीची दातार घराणी मूळच्या कोणत्या आडनावातून निघाली ती माहिती खाली दिली आहे.

**वासिष्ठ ऋग्वेदी** (आश्वलायन)– मूळ आडनांव (४३) **गोवंडे.**

उपनामे (१) गोडशे (२) भातखंडे (३) कुटुंबे (४) गोंधळेकर (५) वैद्य (६) दातार या 'दातार' उपनामाचे पुन्हा भेद :–

(१) दांडेकर (२) वर्तक (३) आधारकर (४) मधुमत्य (५) महाबळ व (६) कोकणे.

(हल्लीची आघरकर, आगरकर उपनामे आधारकर यातच येतात.)

**वासिष्ठ यजुर्वेदी** (तैतीर्य–हिरण्यकेशी)– मूळ आडनांव (५०) **भासे.**

उपनामे : १ दातार २ दात्ये ३ पेठे ४ दोणकर ५ अभ्यंकर ६ मोडक,

(५) अभ्यंकर–भेद : १ नातू २ कार्लेकर ३ तिरडे.

(६) मोडक-भेद : १ विनोद २ भस्मे ३ बेळवंडकर ४ रेशमकर ५ शेवडे ६ भट ७ लंगोटे ८ भवाळे व हारवडे.

**शांडिल्य ऋग्वेदी**– मूळ आडनांव (५८) दामले

उपनामे– १ परचुरे–परचुरे भेद १ दुगल २ दातार ३ काळे.

आपटे घराण्याच्या जंत्रीमध्ये दिलेली ही माहिती बरोबर नाही म्हणून विचारांत घेतली नाही असे श्री. ना गो. चाफेकर हे आपल्या चित्पावन ग्रंथांत (पहिली आवृत्ति पृ. ८३) लिहितात परंतु त्यांनी त्याबद्दल कारणे दिली नाहीत. दुसऱ्या माहितीच्या अभावी ही माहिती चालू संदर्भापुरती घेण्यास हरकत दिसत नाही.

पूर्वी पत्रव्यवहारात, लेखात नांवे देतांना आडनांवे देण्याची पद्धत नव्हती नांव (व वडिलांचे नांव) वेद व सूत्र (सूत्रावरून वेदाचा बोध होतो) असा उल्लेख करीत असत. आडनांवाची प्रथा केव्हांपासून सुरू झाली हे निश्चित समजत नाही. पेशवाईतील पत्रव्यवहारांत तर गोत्र व सूत्राचा उल्लेख येत नसून फक्त पहिल्या दोन नावांनी 'बाजीराव बल्लाळ' 'नारायण गोविंद' असाच व्यक्तींचा उल्लेख बहुतेक ठिकाणी केलेला आहे त्यामुळे त्या ठिकाणी नमूद केलेली व्यक्ती कोणत्या आडनांवाची हे ठरविणे कठीण होते.

दक्षिण कोकणांत राष्ट्रकूटांचे मांडलिक शिलाहार राजाचा अमल इ. स. ८१० ते १२६० होता. त्यांच्या कारकीर्दीत हर्णे मुरूड हा गांव सिद्ध पुरुषाने इ. स. ११०० च्या सुमारास दातारांचेकडून बसविला. त्याबद्दलची माहिती मुरूडच्या बखरीत ( संकीर्ण विभाग पृ. ३१ ) आली आहे. त्यात तेथे तेरा चित्पावन ब्राह्मण कुटुंबाची स्थापना केली त्यांचा आडनावाने उल्लेख आला आहे. हा दातार आडनांवाचा प्रथम उल्लेख समजण्यास हरकत नाही.

त्यानंतरचा उल्लेख शके १५२१ इ. स. १५९९ चा ( संकीर्ण विभाग पृ. ३० ) आढळला आहे.

## २. वेद, गोत्र व प्रवर

( ह्या व पुढील तीन व चार प्रकरणातील माहिती बव्हंशी लिमये कुल-वृत्तांतातून घेतली आहे. )

अनेक वर्षांच्या पारतंत्र्यानंतर आपल्या भारत वर्षास १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य प्राप्त झाले. घटनेप्रमाणे इतर देशाप्रमाणे आपला देश एक धर्मी नसून तो अनेक धर्मी किंवा (सेक्युलर) किंवा धर्मनिरपेक्ष असे मानण्यात येते. तथापि आपण



आर्यवंशी आणि वैदिक किंवा हिंदु धर्माचे अनुयायी आहोत. त्यादृष्टीने आपणा सर्वांस आपल्या धर्माचे स्वरूप, धर्मग्रंथ, आपले कुलग्राम, कुलनाम, कुलदेवता, व कुलाचार याविषयी कांहीं मूलभूत माहिती असणे आवश्यक आहे म्हणून त्याचा परामर्ष येथे थोडक्यात घेतला आहे.

### वेद व वेदग्रंथ

सर्व जगांत आज उपलब्ध असलेल्या वाङ्मयांत वेदवाङ्मय हे अत्यंत प्राचीन समजले जाते. त्यात आलेल्या ग्रहस्थिति व खगोल विषयक उल्लेखांवरून वैदिक वाङ्मयाचा काल शकपूर्व ६००० वर्षामागे जातो. पूर्व परंपरागत वेदमंत्र दीर्घ प्रयत्नांनी एकत्र करून तसेच त्यांचे विषयवार पृथःकरण करून पाराशर व्यास मुनींनी चतुर्वेदाचे संहितीकरण केले असे मानण्यात येते.

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद मानले जातात. यापैकीं यजुर्वेदाचे नंतर २ भाग पडले त्यापैकी एकास शुक्ल यजुर्वेद व दुसऱ्यास कृष्ण यजुर्वेद असे म्हणतात.

प्रत्येक वेदाच्या स्वतंत्र अशा अनेक शाखा निर्माण झाल्या व प्रत्यक शाखेचे वेदग्रंथ स्वतंत्र आहेत.

प्रत्येक शाखेचे संहिता, ब्राह्मण, आरण्यक, व उपनिषद असे चार स्वतंत्र ग्रंथ असून त्या सर्वांस मिळून त्या शाखेचे वेदग्रंथ असे मानण्यात येते.

"**वेदाहि यज्ञार्थमभिप्रवृत्ताः**" वेदवाङ्मय हे प्रामुख्याने यज्ञ संस्थेसाठी प्रवृत्त झाले आहे. यज्ञामध्ये हवि सेवनासाठी देवताना आवाहन करणे हे ऋग्वेदाचे कार्य, आलेल्या देवताना विधिपूर्वक हवि अर्पण करणे हे यजुर्वेदाचे कार्य, देवता-साठी सामगान करून त्यांस संतुष्ट करणे हे सामवेदाचे कार्य, आणि सर्व यज्ञविधी-वर देखरेख करून तो निर्दोष रीतीने पार पाडणे हे अथर्ववेदाचे कार्य आहे. हे यज्ञीय कार्य करण्यासाठी उपयोगात आणावयाच्या मंत्रांचा संग्रह "संहिता" या भागात केला आहे. संहिता हा भाग मंत्रात्मक आहे. या मंत्राचा अर्थ आणि त्यातील विधीचे प्रयोजन आणि संबंध यांचे विवेचन 'ब्राह्मण" ग्रंथात केले आहे. ब्राह्मण हा भाग गद्यात्मक आहे. एकंदर सृष्टीच्या उत्पत्तीविषयी व त्यातील अनेक गहन विषयांचा विचार अरण्यात जाऊन एकाग्रतेने करीत असताना जे वाङ्मय निर्माण झाले ते "आरण्यक" ग्रंथात आलेले आहे. हा भाग चर्चात्मक आहे. आणि शेवटी ज्ञानाचा परिपाक ज्या तत्वज्ञानात झाला ते "उपनिषत" स्वरुपात प्रकट झाले. उपनिषदाचे शेवटी वेदग्रंथ समाप्त होतात, म्हणून त्यास "वेदान्त" अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. वेद ग्रंथात आलेल्या सर्व वचनाना "श्रुति" म्हणून संबोधिले जाते.

ऋग्वेदाच्या २१, कृष्ण यजुर्वेदाच्या ८५, शुक्ल यजुर्वेदाच्या १६, सामवेदाच्या १०००, आणि अथर्ववेदाच्या ९ शाखा होत्या असे समजतात.

ऋग्वेद संहितेची १० मंडले असून त्यात १०२८ सूक्ते आहेत, व १०५५२ ऋचा आहेत. त्या निरनिराळ्या ऋषींनी निरनिराळ्या विषयावर रचिलेल्या आहेत.

दातार घराणी ऋग्वेदी व यजुर्वेदी आहेत. भारद्वाज, कपिलस् व शांडिल्य गोत्रांची सर्व घराणी ऋग्वेदी असून वासिष्ठ गोत्रात कांही ऋग्वेदी व कांहीं यजुर्वेदी आहेत. चित्पावनातील सर्व यजुर्वेदी घराणी कृष्ण यजुर्वेदाचीच आहेत.

यजुर्वेद कृष्ण व व शुक्ल भेदाने दोन प्रकारचा आहे. त्याचा ऐतिहासिक संदर्भ असा की, यजुर्वेदाचे आचार्य वैशंपायन यांच्याकडून ब्रह्महत्या घडली असतां त्या पातकाच्या निवारणार्थ आपल्या चरकाध्वर्यु नामक शिष्यमंडळीस प्रायश्चित्त करण्याची आज्ञा केली. शिष्यांपैकी श्रेष्ठ शिष्य याज्ञवल्क्य यांनीं आपल्या गुरुच्या हातून घडलेल्या ब्रह्महत्येचे पातक नष्ट करण्यासाठी स्वतः एकट्याने प्रायश्चित्त करण्याचे आपल्या गुरुस, वैशंपायनास, सांगितले. त्यामुळे इतर शिष्यांचा अपमान होतो म्हणून याज्ञवल्क्यावर वैशंपायन रुष्ट झाले व त्यास आदेश दिला कीं मी शिकविलेले वेद मला परत कर. त्याप्रमाणे याज्ञवल्क्याने ते वेदमंत्र ओकले व इतर चरक शिष्यांच्यापैकी कांहींनी तित्तिर पक्षाचे रूप घेऊन ते ओकलेले अगाररूप वेदमंत्र उचलले पुढें याज्ञवल्क्याने सूर्याची उपासना करून त्याजकडून यजुर्वेदाचे निवडक मंत्र प्राप्त करून घेतले. हे मंत्र सूर्याने मध्यंदिनसमयी वाजिरुपाने अवतीर्ण होऊन याज्ञवल्क्यास दिले अशी अनुश्रुति आहे. मूळच्या वैशंपायन यांच्या यजुर्वेद भागास कृष्ण यजुर्वेद व याज्ञवल्क्याने प्राप्त करून घेतलेल्या नवीन मंत्र भागास शुक्ल यजुर्वेद अशी नांवे प्राप्त झाली.

(ही माहिती डॉ. हरिकृष्ण माधव दातार, वाराणसी यांनी कळविली आहे.)

या आख्यायिकेचा मुख्य अर्थ इतकाच की वैशंपायनाचा शिष्य याज्ञवल्क्य याने तो संप्रदाय सोडून नवा शुक्ल यजुर्वेदाचा संप्रदाय निर्माण केला. परंतु तित्तिर हा वैशंपायनाशी गुरुनिष्ठ राहिला.

यजुर्वेदामध्ये संहिता व ब्राह्मण हे ग्रंथ एकमेकात मिसळले आहेत.

सामवेदांत ऋग्वेदातील मंत्रच प्रायः घेतले असून ते निरनिराळ्या विशिष्ट चालीवर यज्ञप्रसंगी म्हटले जातात.



अथर्ववेद हा अथर्वांगिरस ऋषींनी रचिला. इतर मंत्राबरोबरच अभिचार, मंत्रतंत्र, जादूटोणा, वशीकरण, गंडे, तोडगे इत्यादिविषयक मंत्रही त्यात पुष्कळ आहेत.

अग्निहोत्र घ्यावयाच्यावेळी करावयाच्या विधीस अग्न्याधान असे नाव आहे. लाकडाच्या दोन फळ्या म्हणजे अरणीमध्ये मंथन करून अग्नि प्रथम निर्माण करतात. हा अग्निनंतर तीन किंवा पाच कुंडांत ठेवावयाचा असतो. गार्हपत्य, आहवनीय व दक्षिणाग्नि हे तीन मुख्य अग्नि सभ्य व आवसथ्य असे आणखी दोन अग्नि मिळून पांच अग्निकुंडे करावी लागतात. या अग्न्याधान प्रसंगी धारण केलेल्या अग्नींचे सतत आयुष्यभर रक्षण करावयाचे असते. या अग्न्याधान विधीचे वेळी व पुढील कोणत्याही यज्ञाचे कामी यजमान, यजमान पत्नी व त्यांचेव्यतिरिक्त (१) अध्वर्यु, (यजुर्वेदी) (२) ब्रह्मा (अथर्ववेदी) (३) होता (ऋग्वेदी) (४) उद्गाता (सामवेदी) (५) अग्नीध्र असे पाच ऋत्विज लागतात. अध्वर्यु हा त्यातील मुख्य होय. उद्गाता अग्निस्थापनेच्या वेळी सामगायन करतो, होत्याने देवतांची स्तुति करणे, ब्रह्म्याने यज्ञविधीवर देखरेख करणे व अग्नीध्राने अध्वर्यूच्या हाताखाली इतर सहाय्य करावयाचे असते. यज्ञप्रसंगी होत्याने (ऋग्वेदी) म्हणावयाचे मंत्र त्या ऋचा, अध्वर्यूने (यजुर्वेदी) म्हणावयाचे मंत्र ते यजु, उद्गात्याने म्हणावयाचे मंत्र ती सामे होत.

ऋग्वेद हा प्रायः मंत्रप्रधान, यजुर्वेद यज्ञक्रिया प्रधान, सामवेद हा गानप्रधान नि अथर्ववेद हा लौकिक विषयप्रधान आहे. वेदाशी निगडित परंतु थोडे बाहेरचे म्हणजे उत्तरकालीन जे ग्रंथवाङ्मय त्यास 'वेदांग" म्हणतात व त्यात कल्पसूत्रे, शिक्षा, व्याकरण, निरुक्त, छंदस् व ज्योतिष या विषयांचा अंतर्भाव होतो. कल्पसूत्रांची रचना गद्यात्मक असून त्यांचा विषय धार्मिक विधि आणि संस्कार हा आहे. कल्पसूत्रांचे तीन भाग असून ते श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे व धर्मसूत्रे होत. श्रौतसूत्रांत तीन (आवहनीय, दक्षिण नि गार्हपत्य) किंवा पांच अग्नीवर होणारी कर्मे ग्रंथित केली असून त्यास "श्रौतकर्मे" म्हणतात. मोठाल्या यज्ञांच्या प्रयोगांचे दिग्दर्शनही त्यात केलेले आहे. गृह्यसूत्रांत एकाग्नीवर म्हणजे गृह्याग्नीवर होणारी कर्मे सांगितली असून त्यात जातकर्म–विवाहादि संस्कार आणि नित्याचे होमहवन यांचा अंतर्भाव आहे. त्यास "स्मार्तकर्मे" म्हणतात. धर्मसूत्रात आचार नि व्यवहारविषयक नियमांचा संग्रह केलेला असून हा भाग भारतीयांचा प्राचीनतम असा निर्बंधसंग्रहच होय. ब्राह्मण, आरण्यक नि उपनिषदाप्रमाणे प्रत्येक वेदाचे स्वतंत्र सूत्रग्रंथही आहेत.

धर्मसूत्रावरूनच पुढे स्मृति झाल्या. वेद म्हणण्याची पद्धति सांगण्याकरिता शिक्षा ग्रंथ निर्माण झाले. वेदांचे व्याकरण सांगणारा ग्रंथ म्हणजे "प्रतिशाख्य"

होय. वेदार्थ करण्याची रीति नि शब्द व्युत्पत्ति दाखविणारा ग्रंथ म्हणजे "निरुक्त" होय. गायत्र्यादिक वैदिक नि लौकिक छंदांची स्वरुपे सांगणारे शास्त्र ते "छंद शास्त्र" होय. यज्ञ योग्य कालाला अनुसरून व्हावेत म्हणून "ज्योतिषशास्त्र" अवतीर्ण झाले.

## कृष्ण यजुर्वेद

मागे दिलेल्या वेदापैकी आपल्यी कृष्ण यजुर्वेदाच्या एकूण ८५ शाखा होत्या. त्यापैकी आज केवळ पांच शाखांच्या संहिता उपलब्ध आहेत, त्या तैत्तिरीय, मैत्रायणी कठ, कापिष्ठल आणि श्वेताश्वतर या होत. वरील शाखांपैकी केवळ "**तैत्तिरीय**" शाखेचेच ग्रंथ संपूर्णतया उपलब्ध आहेत. या शाखेची संहिता व ब्राह्मण ग्रंथ उपलब्ध आहेत. आरण्यक ग्रंथही उपलब्ध असून त्याचे पहिले सहाप्रपाठक आरण्यक म्हणून मानले जातात. त्यापुढील प्रपाठक ७, ८ व ९ हे "**तैत्तिरीय उपनिषद**" म्हणून प्रसिद्ध असून त्या पुढील १० वा प्रपाठक "**नारायणोपनिषत**" होय. यासच मंत्रोपनिषत असेही म्हणतात त्याचे ८० अनुवाक् आहेत. श्रुतिवर आधारलेल्या श्रौत सूत्रापैकी आपस्तंब, बौधायन, हिरण्यकेशी ऊर्फ सत्याषाढ, भारद्वाज, वैखानस, वाधूल आणि मैत्रायणी शाखेचे मानव आणि वाराह अशी फक्त आठ श्रौत सूत्रे उपलब्ध आहेत. यातच गृह्य सूक्तांचा समावेश होतो व धर्मसूत्रे व शूल्ब सूत्रेही याच ग्रंथात एकेक प्रकरणात दाखल केली आहेत. तैत्तिरीय शाखेचा "प्रातिशाख्य" हा व्याकरण ग्रंथ उपलब्ध असून 'शिक्षा' ही उपनिषदातच समाविष्ट झालेली आहे.

कृष्ण यजुर्वेदाच्या कठ या शाखेचे एक उपनिषद विशेष प्रसिद्ध असून त्यास "कठोपनिषत्" म्हणतात

महाराष्ट्रात पंचद्रविड ब्राह्मणापैकी चित्पावनाखेरीज इतर ब्राह्मण हे एकाच वेदाचे अनुयायी म्हणजे देशस्थ ऋग्वेदी, कऱ्हाडे व देवरुखे हे सर्व ऋग्वेदाचे अनुयायी, माध्यदिन आणि कण्व हे शुक्ल यजुर्वेदाचे अनुयायी व चरक हे कृष्ण यजुर्वेदाचे अनुयायी आहेत. केवळ चित्पावन ब्राह्मण हेच ऋग्वेदी आणि कृष्ण यजुर्वेदी अशा दोन्ही वेदांचे अनुयायी आहेत.

हिरण्यकेशिन् हे कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेच्या एका प्रसिद्ध सूत्राचे नाव असून, सूत्रकाराचे नांव सत्याषाढ आहे. त्याची प्रसिद्धि हिरण्यकेशिन् या नावाने होती. याचे श्रौतसूत्र प्रसिद्ध असून त्यातच धर्म, गृह्य आणि शुल्ब सूत्रांचा अंतर्भाव होतो. या सूत्राचे अनुयायी मुख्यतः चित्पावन ब्राह्मणच आहेत. हिरण्यकेशी ब्राह्मणांचा उल्लेख पाचव्यां शतकातील ताम्रपटांत केलेला आढळतो.

वैदिक वाङ्मयाच्या सिंहावलोकनावरून त्यांत उपासना, कर्म आणि ज्ञान यांचे प्रतिपादन केलेले आढळते. त्यात संहिता उपासनेकरिता, ब्राह्मण यज्ञकर्मा



मे. अजित टेक्सटाइल्स; इचलकरंजी

यंत्रमाग धंद्यातील तिसरी पिढी

दातार कुलवृत्तांत प्रसिद्धीचे
सहर्ष स्वागत करीत आहे!

निर्मिती विशेष–

'सुवर्ण' व 'रजत'
सुपरफाइन व डाइड कॅब्रिक

इचकरंजीतील कापड विणकाम धंद्यास स्वप्रयत्नाने चालना देऊन हा
धंदा आत्मनिर्भर होण्यासाठी महाराष्ट्रातील आमच्या पहिल्या
सहकारी सूत गिरणीस स्वतःची जमीन अल्प मोबदल्यात
उपलब्ध करून सक्रिय प्रोत्साहन देणारे--

श्री. अनंत विठ्ठल दातार
श्री. यशवंत विठ्ठल दातार
श्री. मधुसूदन विठ्ठल दातार

यांच्या घराण्याच्या कुलवृत्तांत प्रसिद्धीच्या प्रसंगी
हार्दिक शुभेच्छा !

दि डेक्कन को-ऑप-स्पिनिंग मिल्स लि.
इचलकरंजी जि. कोल्हापूर.



करिता, आरण्यकांत उपासनाद्वारा ज्ञानाकडे मनाचा ओढा व तद्विषयक चर्चा परंतु कर्मनिवृत्ति होत नसल्याचे विवेचन आहे व उपनिषदे ही तत्व म्हणजे ब्रह्मज्ञानासाठी प्रवृत्त झाल्याचे दिसून येते.

वेदपठनाच्या एकूण आठ विकृति म्हणजे प्रकार असून त्यामुळे आज हजारो वर्षे कोणत्याही मंत्रोच्चारांत काडीचाही फरक पडू शकला नाही व हे एक फार मोठे आश्चर्य मानले जाते. जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंड, रथ आणि घन या नावानी या विकृति ओळखल्या जातात. त्यापैकी प्रामुख्याने पद, क्रम, जटा व घन यांचीच पारायणे नेहमी केली जातात.

देवास अनन्यभावाने शरण जाऊन त्याची करुणा भाकीत असल्याची अनेक सूक्ते ऋग्वेदातही आलेली आहेत. कृपाळू परमेश्वराची आपला प्रियसखा, माता-पिता अथवा प्रसंगी पत्नी मानून त्याची आळवणी करणाऱ्या अनेक ऋचा त्यांत आढळतात. भक्ति सूक्तांतील निःसीम भक्तीचा आविष्कार पुढे उत्तरकालीन पौराणिक साहित्यात विकसित स्वरुपात झालेला आढळून येतो, तथापि या भक्तिमार्गाचा उगम थेट ऋग्वेदकालापासून झालेला आढळून येतो.

वेदातील संहिता व ब्राह्मण या कर्मकांडान्तरील भागाची भगवान जैमिनी ऋषींनी सूत्ररूपाने मांडणी केली त्यास धर्मसूत्रे किंवा जैमिनीसूत्रे म्हणजेच पूर्व मीमांसा असे नाव आहे. त्याचे १६ अध्याय आहेत. 'अथातो धर्मजिज्ञासा' असा या सूत्राचा आरंभ आहे. धर्मसूत्रात आचार आणि व्यवहारविषयक नियमांचा संग्रह केलेला असून त्याचे बारा अध्याय आहेत. पुढील चार अध्याय उपासनाकांडासाठी प्रवृत्त झाले आहेत. प्राचीन ऋषीमुनींनी शांतचित्ताने हजारो वर्षे तत्वचिंतनात व्यतीत करून नितांत आनंदाचा उपभोग घेतला. त्यानी आपले हे उदात्त विचार उपनिषदातून प्रकट केले. कृष्णद्वैपायन वेदव्यास महर्षींनी या आरण्यक आणि उपनिषद विभागावर म्हणजे "ज्ञानकांडा"वर सूत्ररूपाने भाष्य केले असून ती "ब्रह्मसूत्रे" या नावानी प्रसिद्ध आहेत. त्यास उत्तर मीमांसा असेही म्हणतात. 'अथातो ब्रह्मजिज्ञासा" असा या सूत्राचा आरंभ आहे.

जीवाचे स्वरूप कसे आहे, ईश्वराचे स्वरूप काय आहें, जीव आणि ईश्वर यांचा संबंध कोणता, जीवाचा जगताशी काय संबंध आहे, इत्यादि गूढ आणि मानवी बुद्धीला गुंग करणाऱ्या प्रश्नांची चर्चा व गणना तत्वज्ञानात करतात. तत्वज्ञान म्हणजेच ब्रह्मज्ञान.

वेदातील उपासना मार्ग हळूहळू मागे पडत जाऊन यज्ञयागादि कर्मकांडाचे प्राबल्य अवास्तव वाढत गेले. मोठमोठे यज्ञयाग करणे, त्यापायी करावी लागणारी

हिंसा, अफाट खर्च व कालाचा अपरिमित व्यय या गोष्टी निरर्थक व अनाठायी वाटू लागल्या. त्यापासून प्रत्यक्ष फलप्राप्ति किंवा दृश्यलाभ मिळता असेही दिसेना. त्यामुळे या कर्मकांडाच्या जंजाळास लोक कंटाळून ते उदासीन बनू लागले. वेदांताचे आकलन होणे हीहि गोष्ट सहज साध्य नव्हती. अशा परिस्थितीत इ. सनापूर्वी ८०० चे सुमारास वैदिक धर्माच्या बरोबरीने अनेक धर्मपंथ आर्यावर्तात प्रचलित होत होते. या धर्मपंथांचे प्रवर्तक हे संसारास विटलेले, वानप्रस्थाश्रमी आणि संन्यस्त वृत्तीने अरण्यात राहत आणि तत्वचिंतनात आपला काळ घालवीत. वेळोवेळी भिक्षेच्या निमित्ताने त्यांचा इतर गृहस्थाश्रमी लोकांशी संबंध येई. त्यामुळे त्यांच्या अनुयायांचे हळूहळू विशिष्ट गट बनू लागले व त्यातूनच जैन धर्म, बौद्ध धर्म इत्यादि धर्मांचा उदय झाला. त्यानी प्रतिपादन केलेली अहिंसा, दलित समाजाबद्दलची समता व करुणा आणि यज्ञादि कर्मकांडाचा संपूर्ण अभाव या गोष्टीमुळे अनेकांची मने या नवीन धर्माकडे आकर्षिली गेली व सर्व भारतभर या धर्मांचा पगडा बहुजन समाजावर व तत्कालीन राज्यकर्त्यांवरही पडला.

आद्य श्रीशंकराचार्यांनी आपल्या तत्वज्ञानाने जैन व बौद्ध मतांचे खंडन करून जुन्या वैदिक धर्माची पुन्हा नवीन स्वरूपात मांडणी केली. यज्ञयागाएवजी पंचायतन पूजा चालू केली व अहिंसा व संन्यासग्रहण यांचा अंगीकार करून वैदिक धर्माने पुनरुज्जीवन केले व आपल्या अलौकिक तत्वज्ञानाने "अद्वैत सिद्धांत" प्रस्थापित केला. नंतरच्या आचार्यानीही आपापली भाष्यरचना करून स्वतंत्र सिद्धांत प्रस्थापित केले. ही त्यांची कामगिरी हिंदु धर्माच्या दृष्टीने अलौकिक अशी आहे.

कोणताही सिद्धांत प्रस्थापित करताना तो श्रुति, स्मृति आणि न्याय या तीन कसोटयांवर उतरला पाहिजे. उपनिषदे हे श्रुति-प्रस्थान, भगवद्गीता हे स्मृति-प्रस्थान आणि ब्रह्मसूत्रे हे न्यायप्रस्थान असे मानतात. या तिन्ही प्रस्थानांवर भाष्य लिहून त्यात एकवाक्यता आहे असे सिद्ध करणारास "आचार्य" ही संज्ञा प्राप्त होते. म्हणून दशोपनिषदे, श्री भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रे या तीन ग्रंथास "प्रस्थान-त्रयी" असे म्हणतात. या ग्रंथांच्या अध्ययनाने व मननाने निरनिराळ्या आचार्यांनी "ब्रह्मस्वरुप" हे अद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत व द्वैताद्वैत या रूपानी वर्णिले आहे. वरील प्रस्थानत्रयीवर आधारलेली आणि त्या ग्रंथातील कोणत्याही वचनास बाध येणार नाही असा दंडक मोठ्या कटाक्षाने पाळून निरनिराळ्या आचार्यांनी आपआपली स्वतंत्र भाष्यरचना करून आपला सिद्धांत प्रस्थापित केला आहे. या सिद्धांतांत पुढील पांच सिद्धांत हे विशेष प्रसिद्ध आहेत.



(१) श्री. आद्य शंकराचार्य-केवलाद्वैत सिद्धांत.
(२) श्री. रामानुजाचार्य --विशिष्टाद्वैत सिद्धांत.
(३) श्री मध्वाचार्य-द्वैत सिद्धांत.
(४) श्री निंबार्काचार्य द्वैताद्वैत.
(५) श्री वल्लभाचार्य-शुद्धाद्वैत.

वरीलपैकी श्री वल्लभाचार्यांनी प्रस्थानत्रयीबरोबरच श्रीभागवत या ग्रंथास समान गौरवपद देऊन "प्रस्थान चतुष्टय" स्वीकारले आहे.

औपनिषद तत्वज्ञानाचा प्रसार करणे हेच सर्व आचार्यांचे मुख्य काम होते व ते त्यांनी आपापले स्वतंत्र सिद्धांत प्रस्थापित करून पूर्ण केले. त्यानी उपासना, ज्ञान आणि कर्म या मार्गाबरोबरच भक्तिमार्गाचा स्वीकार करून हा मार्गही मागे सांगितल्याप्रमाणे वेदप्रणीतच आहे ही भावना समाजात रूढ केली व त्यामुळे वैदिक धर्मावरची लोकांची श्रद्धा पुनरपि दृढ होण्यास बहुमोल सहाय्य झाले.

गेल्या शंभर वर्षात पाश्चात्य तत्वज्ञानाकडे काही सुशिक्षितांची मने आकर्षित झाली. त्यातूनच आर्यसमाज, ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाज उदयास आले. आपल्या महाराष्ट्रात यापैकी कोणाचाही विशेष प्रभाव पडलेला दिसून येत नाही.

पूर्वीच्या सोळा संस्कारांऐवजी महत्वाचे असे चारपाच संस्कार करण्याकड सध्यांची लोकप्रवृत्ति आहे. जुन्या कर्मकांडाकडे किंवा ज्ञानकांडाकडे बहुजन समाज आकर्षित होत नाही. म्हणून अलिकडच्या संतजनांनी भागवत धर्माचा म्हणजेच भक्तिमार्गाचा पुन्हा उत्कट प्रसार केलेला आहे व तो आचरणास सोपा असल्यामुळ त्याकडे बहुजन समाजातील लोक आपुलकीने भाग घेत आहेत. भक्ति, उपासन आणि जपजाप्य या मार्गाकडे अनेक सुशिक्षितांचे लक्ष सध्या आकर्षित झालेले दिसून येत आहे.

## गोत्र आणि प्रवर

चित्पावन ब्राह्मणांची १४ गोत्रे आहेत. चौदा गोत्रामध्ये काही निव्वळ ऋग्वेदी म्हणजे आश्वलायन सूत्राची व काही कृष्णयजुर्वेदी म्हणजे हिरण्यकेशी सूत्राची आणि काही गोत्रे ही उभय सूत्रांची आहेत. एका गोत्राची मंडळी ही मूळची एका कुळातील आहेत असे काही मंडळी समजतात. परंतु ते चूक आहे. गोत्रप्रवर्तक ऋषींच्याकडे अध्ययन करणाऱ्या बटूस त्यांच्या गुरुचे गोत्र त्यांच्या उपनयनाचेवेळी प्राप्त होत असे. एका गोत्राचे म्हणजे एका गुरुकुलात शिक्षण घेतलेले विद्यार्थी हाच त्याचा खरा अर्थ आहे. ही स्थिति स्मृतिपूर्वकाली होती. पुढे कालांतराने पिता हाच गुरू म्हणून आपल्या पुत्राचे उपनयन करू लागल्यानंतर हे पूर्वीचे गुरुगोत्र नंतर पितृपरंपरेने प्राप्त होऊ लागले व तीच चाल पुढे कायम झाली.

वरील चौदा गोत्रांपैकी कपि, बाभ्रव्य आणि नित्युंदन गोत्रे केवळ चित्पावनातच आहेत.

## प्रवर

प्रवराचा उच्चार करण्याचा प्रसंग सामान्यतः संध्येमध्य, गुरूंना अभिवादन करण्याचे वेळी, विवाहप्रसंगी व यज्ञकर्मात येतो. प्रवर या शब्दाचा अर्थ अधिक श्रेष्ठ असा आहे. प्रवरातील ऋषीविषयी कात्यायन ऋषींचे मत पुढे दिल्याप्रमाणे आहे. "पूर्वः प्रवरः उत्पादयितुः उत्तरः प्रतिग्रहोतुः" (ज्ञानकोश भाग ३ पूर्वभाग पृष्ठ ५००) प्रवरातील पहिले ऋषि प्रवराचे उत्पादक व त्यापुढील ऋषि ती परंपरा स्वीकारणारे ऋषि होत, असा वरील वाक्याचा अर्थ आहे. प्रवर सामान्यतः तीन असतात. काही गोत्रांत पंचप्रवर आहेत. ग्रंथात काही ठिकाणी प्रवर एक असल्याचा व क्वचित दोन असल्याचा उल्लेख आढळतो. प्रवर केव्हाही चार असत नाहीत व पाचांपेक्षा अधिक असत नाहीत (आश्वलायन श्रौत सूत्र वृत्ति पृ. ४५७) प्रत्येक गोत्राचे प्रवर ठरलेले आहेत. चित्पावनांच्या १४ गोत्रांपैकी वत्स आणि जामदग्न ही दोनच गोत्रे पंचप्रवरी आहेत. उरलेली सर्व त्रि-प्रवरी आहेत.

गोत्रप्रवर्तक ऋषि यांचे नांव त्यांच्या प्रवरात असतेच असा नियम नाही. चित्पावनांच्या चौदा गोत्रांपैकी कपि, नित्युंदन, बाभ्रव्य, वत्स व विष्णुवृद्ध या गोत्रांच्या प्रवरात गोत्रप्रवर्तक ऋषींचा नामनिर्देश नाही. गोत्रऋषि व प्रवरऋषि यांचा पौर्वापर्य-संबंध निश्चित सांगता येत नाही. प्रवर ऋषि हे गोत्रऋषींचे पूर्वज समजले जातात तर काहींच्यां मते प्रवर हे निव्वळ संप्रदायदर्शक आहे. तथापि इतके निश्चित सांगता येईल की त्या त्या गोत्रामध्ये असणारे प्रवर ऋषि हे त्या त्या गोत्रात होऊन गेलेले श्रेष्ठ ऋषि होत

## दातार घराण्यांची गोत्रे व त्यांचे प्रवर

(१) वासिष्ठ– वासिष्ठ, इंद्रप्रमदा, भरद्वसु.
(२) शांडिल्य– शांडिल, असित, देवल.
(३) काश्यप– काश्यप, आवत्सार, नैध्रुव.
(४) भारद्वाज– आंगिरस, गार्हस्पत्य, भारद्वाज.
(५) कपिलस– आंगिरस, शैन्य, गार्ग्य.

कपिलस व गार्ग्य गोत्रांचे प्रवर एकच आहेत. कपि, भारद्वाज व गार्ग्य हे एकाच कपिकुलातील गोत्रकार आहेत.

## कुलनामें

चित्पावन ब्राह्मणांची सध्या जुन्यात जुनी अशी साठ आडनांवें प्राचीन अशी समजली जातात. त्यांची गोत्रवार वाटणी खालीलप्रमाणे—



| गोत्र | मूळ आडनांवे | संख्या |
|---|---|---|
| (१) अत्रि | आठवले, चित्रे, भाडभोळे | ३ |
| (२) कपि | खांबेटे, जाईल, माईल, लिमये. | ४ |
| (३) काश्यप | गान, गोखले, जोग, लवाटे, लेले. | ५ |
| (४) कौंडिण्य | पटवर्धन, फणसे | २ |
| (५) कौशिक | आपटे, गद्रे बाम, भावे, वाड. | ५ |
| (६) गार्ग्य | करवे, गाडगीळ, दाबके, माठे, लोंढे. | ५ |
| (७) जामदग्न्य | कुंटे, पेंडसे. | २ |
| (८) नित्युंदन | भाडभोके, वैशंपायन | २ |
| (९) बाभ्रव्य | बाळ, बेहेरे. | २ |
| (१०) भारद्वाज | आचवल, गांधारे, घांगुरडे टेणे, दव, रानडे. | ६ |
| (११) वत्स | मालशे. | १ |
| (१२) वासिष्ठ | ओक, गोगटे, गोवंडे, धारू, पोंक्षे, बापट. बागुल, बोडस, भामे, विंझे, साठे, साठये. | १२ |
| (१३) विष्णुवृद्ध | किडमिडे, नेने, परांजपे, मेहेंदळे. | ४ |
| (१४) शांडिल्य | गणपुले, गांगल, (नाम)जोशी, दामले. परचुरे, भाटे, सोमण. | ७ |
| | एकूण उपनामे | ६० |

वरील साठ आडनावांपैकी ३७ हे ऋग्वेदी, शाकल शाखेचे, आश्वलायन सूत्रानुयायी आहेत व अधोरेखित २३ हे कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय शाखेचे हिरण्यकेशी सूत्रानुयायी आहेत.

नतर वरील मूळच्या ६० आडनावात नव्या २४४ आडनावाची भर पडली असून सध्या प्रचलित आडनावे ३०४ झाली आहेत. त्यापैकी २१५ आश्वलायन सूत्राची व ८९ हिरण्यकेशी सूत्राची आहेत. हिरण्यकेशी सूत्राचे अनुयायी मुख्यतः चित्पावन ब्राह्मणच आहेत ही गोष्ट महत्वाची आहे. हिरण्यकेशी ब्राह्मणांचा उल्लेख पाचव्या शतकातील ताम्रपटात आढळतो.

चित्पावन ब्राह्मणांच्या वरील १४ गोत्रांचे ७ गट असून एका गटातील गोत्रांचा एकमेकांशी विवाहसंबंध वैदिक परंपरेने निषिद्ध मानला आहे. ते गट असे–

**अत्रिगोत्राचा एक स्वतंत्र गट आहे**

| | | |
|---|---|---|
| कपि, गार्ग्य, भारद्वाज | काश्यप, शांडिल्य | कौंडिण्य, वाशिष्ठ |
| कौशिक, बाभ्रव्य | जामदाग्न्य, वत्स | नित्युंदन, विष्णुवृद्ध |

प्रत्येक गटाशी ऋषी एकमेकांशी संबंधित आहेत.

## ३. चित्पावन ब्राह्मण

(संशोधनात्मक संकलीत माहिती)

( दातार आडनावाची भारद्वाज व कपिलस या गोत्रातील प्रत्येकी एक एक अशी दोन घराणी देशस्थात आहेत. बाकीची सर्व चित्पावनात आढळतात. त्यामुळे चित्पावनासंबंधित विशेष माहिती खाली दिली आहे.)

'चित्तपावन' हा शब्द सह्याद्रि खंड आणि शतप्रश्न कल्पलता या संस्कृत ग्रंथामध्ये मुख्यतः आढळतो त्यानंतर चित्पावन हा शब्द छत्रपति शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून विशेष आढळू लागला. पेशव्यांच्या कारकीर्दीत 'चित्पावन' शब्द मागे पडून त्याचा पर्यायी 'कोंकणस्थ' हा शब्द त्यांनी चित्पावन शब्दाऐवजी प्रचलित केला. एन्थोव्हन " Tribes and Castes ' या ग्रंथात असे लिहितो की, इ. स. १७१५ पर्यंत कोंकणस्थ हा शब्दप्रचारात नव्हता पेशवाईचा उदय होण्यापूर्वी चित्तपावन ही जात विशेष प्रसिद्धीस आली नव्हती.

पेशवाईच्या आरंभी बरेच दिवसपर्यंत कोंकणस्थांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळे त्यांची अवहेलना करण्याकरता इतर ब्राह्मण मंडळी त्यांना आपल्या पंक्तीलाहि घेत नसत. पेशवे हे स्वतः चित्पावन असल्यामुळे व त्यांनी केलेल्या पराक्रमामुळे ह्या शब्दाला पुढे जगप्रसिद्धी मिळाली व चित्पावन हे कोण, कुठले, कोठून आले इत्यादि चिकित्सा सुरू झाल्या व या संबंधीचे संशोधन कार्य करण्यास अनेक विद्वान पुढे आले

आपला पिता जमदग्नी याचा कार्तवीर्याने वध केल्यामुळे मातेच्या आज्ञेवरून परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली पुढे या संहाराबद्दल परशुरामाला प्रायश्चित्त घ्यावे असे वाटू लागले. पण प्रायश्चित्तार्थ यज्ञ करण्यास कोणी ब्राह्मण मिळेनात. त्यामुळे त्याला चिंता पडली. इतक्यात दुरून एक जहाज फुटल्यामुळे त्यांतील काही मृतप्राय व्यक्ती समुद्रातून वहात येत असल्याचे परशुरामाने महेन्द्र



पर्वतावरून पाहिले. ह्या प्रेतांना जिवंत करून त्याने त्यास ब्राह्मण धर्म शिकवला आणि ह्या चौदा प्रेतांपासून उत्पन्न केलेल्या ब्राह्मणांना वसाहतीसाठी त्याने समुद्र मागे हटवून नवीन क्षेत्र निर्माण करून दिले. त्यासच कोकण ऊर्फ परशुराम भूमि असे म्हणतात व हे ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यातील सध्याच्या चिपळूण तालुक्याचा भाग होय. वाशिष्ठी व शिव या दोन नद्यांच्या पुलिनावर (पुलिन म्हणजे पुळण; चित्पुलीन म्हणजे चिपळुण) चिपळूण येथे चित्तपावनांची पहिली वसाहत झाली असे सह्याद्रि खंडात लिहिले आहे. तथापि सह्याद्रि खंडाच्या छापील पोथीत हीच कथा थोडी निराळ्या रितीने सांगितली आहे. समुद्रतीरी परशुराम स्नानास गेला असता कांही माणसे अचानक त्याच्या दृष्टीस पडली तेव्हा परशुरामाने त्यांची विचारपूस केली. त्यांनी आम्ही कोळी आहोत मासे मारण्याच्या कामी कुशल आहोत, समुद्रतीरी राहतो अशी उत्तरे दिली. परशुरामाने त्यांच्या जाळ्यांची प्रतीके म्हणून त्यास जानवी करून दिली व त्यांची साठ कुळे पवित्र केली.

इ. स. १८७७ मध्ये जे. कुन्हा यानी सह्याद्रिखंड प्रसिद्ध केले आहे. त्यातील उत्तरार्धाचा पहिला अध्याय 'चित्तपावन ब्राह्मणोत्पत्ति' हा आहे व त्यात ५४ श्लोक आहेत. त्यातील ३७ वा श्लोक असा आहे-

चितास्थाने पवित्रत्वात् चित्तपावन संज्ञकाः

यापुढे ८८ वा श्लोक-

अधुना मम चित्तस्य पावनं क्षेत्रमस्तुतत्च<br>
अत्र विप्रा ब्रह्मविदोनाम्ना तेन महोज्जालाः

अर्थ-आज हे चित्तपावन क्षेत्रच माझे वसतिस्थान असो. याच क्षेत्रात त्याच चित्तपावन नावाचे ब्रह्मज्ञ ब्राह्मण फारच तेजस्वी आहेत.

तत् चित्तपावनं क्षेत्रं लोकेख्यातिमगात्तदा<br>
तस्य दर्शनमात्रेण चित्तंपूतं भवेत् क्षणात् ।

अर्थ-तेव्हापासून हे क्षेत्र "चित्तपावन" या नावाने प्रख्यात झाले. त्याच्या दर्शनाने एका क्षणात चित्त शुद्ध होते.

येथे या स्थलाचे नाव चित्तपावन आहे व त्या चित्तपावन क्षेत्रात राहणाऱ्यांनाहि चित्तपावन म्हणू लागले असा वरील ८८ व्या श्लोकाचा अर्थ आहे. उदा. मथुरे जवळील देशाला शूरसेन म्हणतात व त्यातील लोकांनाहि शूरसेन असेच म्हणतात. सह्याद्रिखंडाच्या विसाव्या अध्यायातील १७ व्या श्लोकात 'अत्यल्पदानसंतुष्टाश्चित्तपूता इति श्रुताः' असे चित्तपावनांचे वर्णन केले आहे.

गुहागर महात्म्यांत-

धन्यंच मामकं क्षेत्रं तृप्तिं यातश्च पूर्वजाः ।
तपः सिद्धिश्च संजाता चित्तस्य पावनं तथा ॥१७॥
अत्र ऋषिगणाः सर्वे यूयंच चित्तपावनाः ।
भवतामीप्सितं यद्यत् वृणुध्वं प्रापयामि वः ॥१८॥

अर्थ–माझे क्षेत्र धन्य आहे. माझे तप सिद्धीस गेले व माझे चित्त पवित्र झाले. येथील सर्व ऋषिगण व तुम्ही चित्तपावन आहात म्हणून तुम्हास जे मागावयाचे असेल ते मागून घ्या.

तात्पर्य चित्तपावनांची स्तुतिदर्शक व निंदादर्शक अशी दोन्ही वर्णने आढळतात.

कोकणात समुद्राचे मेरेस प्रेते जाळतात म्हणून या चितास्थानी पवित्र केल्या. मुळे या ब्राह्मणांस चित्तपावन असे नांव प्राप्त झाले असे सह्याद्रिखंडात लिहिले आहे. मात्र ह्या सह्याद्रिखंडास किती प्रमाण मानावयाचे हा एक वादग्रस्त प्रश्नच आहे. श्री. गुंजीकर म्हणतात कीं, हे सह्याद्रिखंड फार अलिकडच्या लेखांनी भरलेले आहे. पुस्तकाची रचनाहि अस्ताव्यस्त दिसते व ती एकाच्याच हातची असेल असे म्हणवत नाही व त्यातील मजकुरहि एकसारखा नाही. तशात ह्या सह्याद्रिखंडाच्या पोथ्या प्राय: देशस्थ ब्राह्मणांच्याच संग्रही आढळतात. त्यावरून या सह्याद्रि खंडाचा कर्ता बहुधा कोणीतरी कोकणस्थ व कऱ्हाडेद्वेष्टा असावा. ते पुढे म्हणतात चित्तपावन ब्राह्मण ज्या प्रदेशामध्ये पूर्वीपासून राहत आले आहेत. त्या प्रदेशाला 'बर्बर कोकण' असे नांव आहे. ह्या बर्बर कोकणच्या थेट पश्चिमेस समुद्रापलीकडे आफ्रिका खंडातील इजिप्त देश आहे. तेथे किनाऱ्यापासून पश्चिमेस ५० कोसावर बर्बर या नावाचे प्राचीन नगर आहे व त्या प्रदेशाला 'बर्बर' देश असे नांव आहे.

केरलाश्च तुलिङ्गांश्च तथा सौराष्ट्रवासिनः ।
कोंकणाश्च, कुडालाश्च वरालाटाश्च बर्बराः ॥

बर्बर देशातील लोक हिंदुस्थानातील मूळच्या लोकांपेक्षा पुष्कळ गोरे, उंच बांध्याचे, सरळ नाकाचे आणि घाऱ्या डोळ्यांचे असतात,

रत्नागिरी जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्ये (आवृत्ति १९६२ पृ. ९७) खालील उल्लेख आहे.

इ. सनापूर्वी २००० वर्षाच्या सुमाराम आशिया मायनर ह्या प्रांतांत नॉर्डिक लोकांचे अस्तित्व होते. या नॉर्डिक लोकांच्याबरोबरच चित्तपावन ब्राह्मण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन स्थायिक झाले असावेत आणि म्हणूनच चित्तपावन



ब्राह्मणांत घाऱ्या डोळ्यांचे वैशिष्टय दिसून येते, असे मत डॉ. जी. एस. घुर्ये यांनी प्रतिपादन केले आहे.

कै. रावसाहेब मंडलिक यांच्या तर्काप्रमाणे चित्तपावन हा शब्द इजिप्तवान्, जिप्तवान, चिप्तवान, चित्तपावन असा अपभ्रंश होत जाऊन बनलेला असावा. आणि चित्तपावन हे मूळ इजिप्तमधून आले असावेत म्हणून ते इजिप्शियन होत असे डॉ. भाऊ दाजी यांचे मत आहे आणि बर्बर कोंकण म्हणजे कोंकणच्या ज्या प्रदेशांत हे बर्बर देशाचे लोक येऊन राहिले तो प्रदेश, आणि परशुरामाच्या वेळेस हे लोक निकडून आले व तारवातून आले असा सरळ अर्थ घेतला म्हणजे रा. मंडलीक यांचा तर्क व सह्याद्रिखंडाचा सबंधहि सहजच जुळतो.

कोणी म्हणतात चित्त पोळणारे, चित्तपोळे म्हणजे चित्पावन ह्यालाहि आधार सह्याद्रि खंडाचाच. परशुरामाने समुद्र हटवून तेथे नव्या ब्राह्मणांची स्थापना केल्यानंतर तो गोकर्ण महाबळेश्वराकडे गेला. "संकट पडल्यास माझे स्मरण करा. म्हणजे मी येऊन त्याचे निवारण करीन" असे त्याने या ब्राह्मणांना जाताना सांगून ठेवले होते. परशुरामाने दिलेले हे आश्वासन पडताळून पहावे म्हणून त्या ब्राह्मणांनी उगाच आक्रोशाला सुरुवात केली त्याबरोबर परशुराम धावत आला. पण या ब्राह्मणांनी आपणास फसविले आहे असे त्यास आढळून आल्यामुळे त्याने क्रोधाविष्ट होऊन 'तुम्ही निंद्य, दुर्गुणी व पतित व्हाल' असा त्यास शाप दिला. तथापि पुनः ब्राह्मणांनी हात जोडून त्याची प्रार्थना केल्यावर त्याचा राग शांत झाला व तपश्चर्या केल्याने तुम्ही शुद्ध व्हाल, पावन व्हाल असे अभयवचन परशुरामाने त्याम दिले. त्याप्रमाणे चित्ताने पावन झालेले ते चित्तपावन असेहि म्हणतात.

प्रि. डी. आर. भांडारकर हे चित्पावनांची गोत्रे व पॅलेस्टाईन प्रांतातील स्थळांची नांवे यांतील सादृश्यावरून त्या प्रांताशी चित्पावनांचा संबंध जोडतात व यहुदी लोकांच्या स्थलांतराचे काळी जे लोक निरनिराळ्या देशात विखुरले त्यापैकीच एखाद्या जमातीचे हे चित्पावन लोक असावेत असा तर्क करतात.

कुडाळदेशकर इतिहास संशोधक रा. ब. बांबर्डेकर म्हणतात की चित्तपावन हे मूळचे तुर्की ब्राह्मण होत. सोरटी सोमनाथ येथे अद्यापि कांहीं तुर्की ब्राह्मण आढळतात. तुर्कस्थान, आशिया मायनर या भागात पूर्वी चातुर्वर्ण्य होते व आर्य संस्कृतीचे हे साम्राज्य मुसलमानी उत्पातापूर्वी या प्रांतात होते. आजच्या तुर्कस्थान प्रांतातील काही हिंदुधर्मीय चातुर्वर्ण्यवान् ब्राह्मण जे जहाजात बसून भारतात आले त चित्तपावन ब्राह्मण. ते प्रथम सोरटी सोमनाथजवळ उतरले असावेत व कांहीं काळानंतर पुन. जहाजात बसून चिपळूण प्रांती येऊन स्थायिक झाले असावेत व

म्हणून जुनी चित्पावनी भाषा आणि गुजराथी भाषा यात विशेष साम्य दिसून येते. त्याचप्रमाणे गुजराथेतील नागर ब्राह्मण व चित्पावन ब्राह्मण यांच्या चेहरेपट्टीत व वर्णात पुष्कळ साम्य दिसून येते. चित्पावन ब्राह्मण आणि नागर ब्राह्मण यांचे मूळ कदाचित एक असावे. 'शतप्रश्न कल्पलता' या ग्रंथाचा कर्ता माधव असे म्हणतो की सह्याद्रिच्या पश्चिमेस १४ ब्राह्मण वेदवेदांगज्ञ असे सत्कर्म करीत होते. अकस्मात् समुद्रवासी बर्बरांनी त्यांना पळवून नेले आणि त्यामुळे म्लेंच्छ संगतीने हे ब्राह्मण पतित झाले. कालेकरून परशुरामाने त्यांना प्रायश्चित्त देऊन शुद्ध केले, १४ गोत्रे व ६० उपनावे दिली, शाकल आणि तैत्तिरीय अशा शाखांचे अध्ययन करण्यास सांगितले व त्यांचेकडून वेदाध्ययन करवून त्यांच्या चित्ताची शुद्धि केली, म्हणून ते चित्तपावन ब्राह्मण होत.

श्री. गुंजीकरांच्या मते ह्या माधवाचा काल छत्रपति राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत म्हणजे बराच अलीकडे येतो, त्यावेळी चित्पावन ब्राह्मण नुकतेच देशावर येऊ लागले होते व राज्यकारभारात शिरणेची धडपड करीत होते. त्यावेळच्या कुत्सित लेखकांपैकीच हाहि एक असावा.

चित्पावन हा चित्तपावन या शब्दाचा अपभ्रंश व चित्तपावन हा चित्यपावन शब्दाचा अपभ्रंश चित्तीसंबंधी कृत्य ते चित्य वावभर जमीन नांगरून त्यावर विटा अंथरून विविध पक्षांच्या आकारासारखी एकेक आकृति त्या भूमीवर विटांनी चित्रित करावयाची त्याचे नांव चित्ति. अग्निचयनात अशा पांच चित्या लागतात. चितिवर प्रज्वलित केलेला अग्नि तो चित्याग्नि. ह्या चित्यग्निच्या उपासनेने पावन झालेले लोक ते चित्यपावन म्हणजे चित्पावन ब्राह्मण होत. परशुरामाने आणलेले हे चित्पावन ब्राह्मण वैदिक धर्माप्रमाणे वागणारे व यज्ञयागादि करणारे होते. ते प्रथम दाभोळच्या खाडीतून उतरून परशुराम पर्वतावर येऊन त्या पर्वताच्या पायथ्याशी व आसपासच्या प्रदेशांत आपली वसति करून राहिले. या चित्यपावन शब्दाची अवहेलना आणि चेष्टा करून व दुष्ट बुद्धीने त्याचा चितेशी संबंध जोडून चितेपासून पावन झालेले चित्तपावन अशी व्युत्पत्ति या जातीचा उत्कर्ष सहन न होणाऱ्यांनी प्रसृत केली असावी.

प्रसिद्ध इतिहास संशोधक कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या मते पर्शू म्हणजे फरश अथवा कुऱ्हाड. पर्शु हे पुरातनकालीन एका आयुधजीविसंघाचे नांव आहे. पाणिनीने (५।३।११७) त्याचा उल्लेख केला आहे. असूर लोकांचे इतिहासांत 'पर्सु-अ' या नांवाने पर्शूंचा उल्लेख आढळतो. हे पर्शू अर्वाचीन पारसिकांचे पूर्वज होत. पर्शुराम हा पर्शु होता म्हणजे प्राचीन पारसिकांचे व ग्रीसमधील प्राचीन ग्रीशियन लोकांचे पूर्वज यांचे अन्योन्य संबंध असावेत. पर्शुमधील जो परशुराम



त्यानें शालिवाहन शकापूर्वी १२२५ च्या सुमारास १४ चित्पावनांची कोंकणात ऊर्फ अपरांतात स्थापना केली.

पुरातन काळी पर्शू या प्रांतात म्हणजे आशिया मायनरमध्ये चातुर्वर्ण्य होते.

पर्शूंच्या जनपदातील पराक्रमी परशुरामाने आपल्याबरोबर ब्राह्मण कोंकणात आणले असावेत. पर्शूंच्या शेजारी असीरियन म्हणजे असुर लोकांचे मोठे साम्राज्य पसरले होते. मुसलमानांच्या जुलुमाने पारशी लोक आपला देश सोडून जसे हिंदुस्थानात आले तसे ह्या क्रूर असुरांच्या जुलुमामुळे चित्पावन ब्राह्मण कोंकण किनाऱ्याच्या आश्रयाला आले असण्याचा बराच संभव आहे.

परशुराम आणि भार्गवराम ह्या दोन व्यक्ति निरनिराळ्या मानल्या पाहिजेत. पर्शूधारी परशुराम हा पर्शू देशातील म्हणजे इजिप्त किंवा पर्शियाकडील असावा. या परशुरामानेच भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर तिकडील ब्राह्मण आणून त्यांची वसाहत केली. ते चित्पावान ब्राह्मण होत.

भार्गवराम याचे कार्यक्षेत्र निराळे म्हणजे गुजराथ. भार्गव हे आडनाव उत्तरेकडेच आढळते. तसेच भार्गव ब्राह्मण हेहि गुजराथेतच आढळतात. परशुराम हे नांव महाभारताच्या प्रतीत कोठेहि सापडत नाही, भार्गव अथवा जामदग्न्य मात्र सरसहा आढळते. वैदिक वाङ्मयात परशु अज्ञात दिसतो व तो मध्यपूर्वेच्या देशात प्राचीन काळच्या शिल्पात आढळतो. ह्या दोन परशुरामांची गल्लत पुराणिकांनी केली असावी.

चित्तपावन असा शब्द स्वतंत्र ऐतिहासिक हस्तलेखात कोठे सापडतो की काय हे पाहत असता श्री. राजवाडे यांना तो अलिबागेस किरवंत जातीच्या संबंधाने असलेल्या संमतीपत्रात आढळला. ह्या संमतीपत्रात तीन रकाने असून पहिला रकाना चित्तपावन ब्राह्मणास, दुसरा देशस्थ, द्रविड व तेलंग ब्राह्मणास व तिसरा रकाना कऱ्हाडे ब्राह्मणास मुख्यतः विभागून दिलेला आहे. पहिल्या रकान्यातील सह्यांपैकी एक सह्या ' संमतीयमर्थः सदाशिव ( ) भट्ट दीक्षित चितळे, चित्तपावनस्थ ( ) धर्माधिकारी " अशी आढळली.

ह्या उल्लेखावरून श्री. राजवाडे यांचे म्हणणे असे की चित्तपावनस्थ म्हणजे चित्तपावन ग्रामस्थ किंवा प्रांतस्थ अर्थ स्वीकारणे क्रमप्राप्त आहे व चित्तपावन या नावाचा गाव कोंकणात कोठेतरी अस्तित्वात असला पाहिजे.

श्री. राजवाडे यांच्या या विधानावर रा. ब. काशिनाथ नारायण साने यांनी आक्षेप घेऊन राजवाडे यांच्या वरील विधानाचे संपूर्ण खंडन केले आहे ते असे—

(१) प्रथमतः हे संमतिपत्र अस्सल नाही केवळ नक्कल आहे. (२) ही नक्कल कोणी कोठे कधी केली याचा निर्देश नाही. (३) ही नक्कल अशुद्ध असून बऱ्याच ठिकाणची अक्षरे त्यात गाळली गेली आहेत. उदा. पहिल्या सहीत (भ) हे अक्षर गाळले आहे. नंतरच्या एका सहीत बाळकृष्ण दीक्षित पाट ( ) कर असे लिहिले आहे. म्हणजे त्यातील पाटणकर या नांवातील 'ण' अक्षर गाळले आहे. यामुळे चित्तपावन पाटणकरांचे ऐवजी गौड ब्राह्मण पाटकर असे नाव झाले आहे.

वरील संमतीपत्राच्या दुसऱ्या सहीत "संमतमिदम् महादेवभट्ट खरे ग्वाहागरकर प्रांत धर्माधिकारी" असे शब्द आहेत. त्यावरून असे दिसते की, पहिल्या सहीतील दुसऱ्या ओळीतील चित्तपावन 'स्थ' या शब्दापुढील (ल) हें अक्षर गळले असले पाहिजे. म्हणजे ती सही 'चित्तपावनस्थल धर्माधिकारी' अशी असली पाहिजे. वरील संमतीपत्राच्या प्रत्येक रकान्यातील पहिल्या सर्व सह्या धर्माधिकारी यांच्या आहेत. त्यातील पहिल्या रकान्यात सदाशिवभट्ट चितळे, चित्तपावनस्थल धर्माधिकारी, नंतर महादेवभट्ट खरे प्रांत धर्माधिकारी. दुसऱ्या रकान्यात त्रिलोचनभट्ट धर्माधिकारी, तिसऱ्या रकान्यात श्रीमद् धर्माधिकारी नारायण पंडित याप्रमाणे प्रथम धर्माधिकाऱ्यांच्या सह्या झाल्यानंतर त्याखालील सह्या इतर ब्राह्मणांच्या आहेत.

याप्रमाणे पहिल्या रकान्यातील दुसरी सही ज्याअर्थी स्पष्टपणे प्रांत धर्माधिकारी अशी आहे त्याअर्थी पहिली सही स्थलधर्माधिकारी असली पाहिजे हे निर्विवाद आहे आणि हे मान्य झाले म्हणजे राजवाड्यांच्या चित्तपावनस्थ ह्या चुकीच्या पाठावरून केलेले तर्क पार ढासळून पडतात.

रत्नागिरी जिल्ह्याचे जुने माहितगार चित्तपावन असा गांव किंवा प्रांत कोठे असल्याचे सांगत नाहीत, तसेच सरकारी गॅझेटकारासहि अशी माहिती कोणी दिलेली नाही किंवा त्यास अशा स्थळाचा शोधहि कोठे लागलेला नाही. चित्तपावन या शब्दाचा निश्चित अर्थ काय असावा हें सांगणे कठीण असले तरी अनुमान करावयाचे झाल्यास चित्तपुलिन, चित्तपोलन, चिपळूण या शब्दांपासून ते रूप सिद्ध झाले असावे, त्यांचा संबंध चिपळूणशी आहे व चिपळूण व त्याच्या सभोवतालचा प्रदेश हा चित्तपावनांचा मूळ देश दिसतो. हे लोक समुद्रमार्गाने आले असावेत व तसे असल्यास ते कदाचित सौराष्ट्र, काठेवाड, कच्छ किंवा सिंधमधून आले असावेत असे भाषासाम्यावरून वाटते असा साने यांचा निष्कर्ष आहे.

प्रसिद्ध वैयाकरणी श्री. गोविंद कृष्ण मोडक यांचे मत पुढीलप्रमाणे आहे.

सह्याद्रि पर्वतास लागून असलेल्या समुद्राचे पाणी परशुरामाने शर टाकून मागे हटविले व सुमारे वीस कोस रुंदीच्या जमिनीची पट्टी नवीन तयार करून त्यावर चित्तपावन ब्राह्मणांची वसाहत करविली. म्हणजे त्याने तेथे काय केले तर जमीन साफसूफ करून ती वसतिक्षम केली. या कामात फोडणे, खणणे, सपाट करणे इत्यादि क्रियांचा अंतर्भाव होतो. डुक्कर आपल्या तोंडाने जमीन खणते. त्याच्या तोंडास 'पोत्र' असे म्हणतात. स्त्रिया ज्या कपड्याच्या बोळ्याने शेणखळा लावून जमीन स्वच्छ करतात त्यास पोतेरे म्हणतात. पोत्र व पोतेरे हे दोन्ही शब्द 'पू' या धातूपासून निघाले आहेत. तेव्हा खणणे, स्वच्छ करणे इ. क्रिया पू धातुचा अर्थ ठरतो. त्याने क्रिया करणारा पावन–पुनाति सः, जसे नंदयति सः नंदनः त्याचप्रमाणे मथनाति सः मंथनः, वरीलप्रमाणे 'पू'चा अर्थ घेऊन वसाहत करणारा तो पृथ्वीचा पावन असे ठरते. आता परशुरामास अशा पावनांची म्हणजे क्षेत्र निवासक्षम करणाऱ्यांची जरूरी लागली तेव्हा या लोकांना कोणती संज्ञा प्राप्त होणार? अर्थात भूमिपावन किंवा एतादृश अशी दुसरी संज्ञा लावण्यात येणार, म्हणून क्षितिपावन हा शब्द येथे विशेष समर्पक दिसतो.

भूमि साफ करणे म्हणजे ती वसाहतीस योग्य करणे. 'क्षि' धातूचा अर्थ वसणे व क्षितिचा अर्थ जिच्यावर वसति करतात ती असा आहे. यमक्षय म्हणजे यमाचे वसतिस्थान.

येथे क्षिति हा शब्द आपणास योग्य दिसतो, तोच पावन याशी समस्त होऊन क्षितिपावन अशी संज्ञा बनली व तिचा अर्थ जमीन साफसूफ करून तिला क्षिति म्हणजे वसतिक्षम प्रदेश बनविणारा असा ठरतो. याप्रमाणे परशुरामाच्या साथीदार ब्राह्मणास लावण्यास क्षितिपावन ही संज्ञा अन्वर्थक ठरते. रचनादृष्ट्या हिचा संबंध चित्तपावन ह्या शब्दाशी जुळतो. क्षेत्रसिंह याचे रूपांतर क्षेतसिंग,चेतसिंग. लक्ष्मण याचे लचमण या धर्तीवर क्षचा च बनून क्षितिचे रूपांतर चिति असे झाले; पुढे छोटिका-चुटकी या धर्तीवर क्षितिचे जागी चिति आले. तात्पर्य क्षितिपावन म्हणजेच चित्तपावन.

यावर करले येथील श्री. महादेव विठ्ठल लिमये यांनी पुढील मत व्यक्त केले आहे.

श्री. गो. कृ. मोडक यांनी पावन ह्या शब्दातील 'पू' ह्या धातूचा अर्थ शुद्ध करणे, खणणे, चोखाळणे असा घेऊन क्षितिपावन हे नांव चित्तपावन याचेशी अन्वर्थक आहे असे सिद्ध केले आहे. आता पावन या शब्दातील 'पू' या धातूपासून 'पावक' म्हणजे अग्नि हाहि शब्द सांधलेला आहे, त्याअर्थी 'पू' धातूचा 'जाळणे' हा अर्थ घेऊन क्षितिपावन ह्या शब्दाचा अर्थ कसा होतो ते पाहू.

आपणास हिंदू हे नाव प्रथम बाहेर देशच्या लोकांनी दिले व नंतर आम्ही आपणास हिंदू म्हणवू लागलो. त्याचप्रमाणे क्षितिपावन किंवा चितिपावन किंवा

(१) प्रथमत: हे संमतिपत्र अस्सल नाही केवळ नक्कल आहे. (२) ही नक्कल कोणी कोठे कधी केली याचा निर्देश नाही. (३) ही नक्कल अशुद्ध असून बऱ्याच ठिकाणची अक्षरे त्यात गाळली गेली आहेत. उदा. पहिल्या सहीत (भ) हे अक्षर गाळले आहे. नंतरच्या एका सहीत बाळकृष्ण दीक्षित पाट ( ) कर असे लिहिले आहे. म्हणजे त्यातील पाटणकर या नांवातील 'ण' अक्षर गाळले आहे. यामुळे चित्तपावन पाटणकरांचे ऐवजी गौड ब्राह्मण पाटकर असे नाव झाले आहे.

वरील संमतीपत्राच्या दुसऱ्या सहीत "संमतमिदम् महादेवभट्ट खरे ग्वाहागरकर प्रांत धर्माधिकारी" असे शब्द आहेत. त्यावरून असे दिसते की, पहिल्या सहीतील दुसऱ्या ओळीतील चित्तपावन 'स्थ' या शब्दापुढील (ल) हें अक्षर गळले असले पाहिजे. म्हणजे ती सही 'चित्तपावनस्थल धर्माधिकारी' अशी असली पाहिजे. वरील संमतीपत्राच्या प्रत्येक रकान्यातील पहिल्या सर्व सह्या धर्माधिकारी यांच्या आहेत. त्यातील पहिल्या रकान्यात सदाशिवभट्ट चितळे, चित्तपावनस्थल धर्माधिकारी, नंतर महादेवभट्ट खरे प्रांत धर्माधिकारी. दुसऱ्या रकान्यात त्रिलोचनभट्ट धर्माधिकारी, तिसऱ्या रकान्यात श्रीमद् धर्माधिकारी नारायण पंडित याप्रमाणे प्रथम धर्माधिकाऱ्यांच्या सह्या झाल्यानंतर त्याखालील सह्या इतर ब्राह्मणांच्या आहेत.

याप्रमाणे पहिल्या रकान्यातील दुसरी सही ज्याअर्थी स्पष्टपणे प्रांत धर्माधिकारी अशी आहे त्याअर्थी पहिली सही स्थलधर्माधिकारी असली पाहिजे हे निर्विवाद आहे आणि हे मान्य झाले म्हणजे राजवाड्यांच्या चित्तपावनस्थ ह्या चुकीच्या पाठावरून केलेले तर्क पार ढासळून पडतात.

रत्नागिरी जिल्ह्याचे जुने माहितगार चित्तपावन असा गांव किंवा प्रांत कोठे असल्याचे सांगत नाहीत, तसेच सरकारी गॅझेटकारासहि अशी माहिती कोणी दिलेली नाही किंवा त्यास अशा स्थळाचा शोधहि कोठे लागलेला नाही. चित्तपावन या शब्दाचा निश्चित अर्थ काय असावा हें सांगणे कठीण असले तरी अनुमान करावयाचे झाल्यास चित्तपुलिन, चित्तपोलन, चिपळूण या शब्दांपासून ते रूप सिद्ध झाले असावे, त्यांचा सबंध चिपळूणशी आहे व चिपळूण व त्याच्या सभोवतालचा प्रदेश हा चित्तपावनांचा मूळ देश दिसतो. हे लोक समुद्रमार्गाने आले असावेत व तसे असल्यास ते कदाचित सौराष्ट्र, काठेवाड, कच्छ किंवा सिंधमधून आले असावेत असे भाषासाम्यावरून वाटते असा साने यांचा निष्कर्ष आहे.

प्रसिद्ध वैयाकरणी श्री. गोविंद कृष्ण मोडक यांचे मत पुढीलप्रमाणे आहे.

सह्याद्रि पर्वतास लागून असलेल्या समुद्राचे पाणी परशुरामाने शर टाकून मागे हटविले व सुमारे वीस कोस रुंदीच्या जमिनीची पट्टी नवीन तयार करून



त्यावर चित्तपावन ब्राह्मणांची वसाहत करविली. म्हणजे त्याने तेथे काय केले तर जमीन साफसूफ करून ती वसतिक्षम केली. या कामात फोडणे, खणणे, सपाट करणे इत्यादि क्रियांचा अंतर्भाव होतो. डुक्कर आपल्या तोंडाने जमीन खणते. त्याच्या तोंडास 'पोत्र' असे म्हणतात. स्त्रिया ज्या कपड्याच्या बोळचाने शेणखळा लावून जमीन स्वच्छ करतात त्यास पोतेरे म्हणतात. पोत्र व पोतेरे हे दोन्ही शब्द 'पू' या धातूपासून निघाले आहेत. तेव्हा खणणे, स्वच्छ करणे इ. क्रिया पू धातुचा अर्थ ठरतो. त्याने क्रिया करणारा पावन–पुनाति सः, जसे नंदयति सः नंदनः त्याचप्रमाणे मथनाति सः मंथनः, वरीलप्रमाणे 'पू'चा अर्थ घेऊन वसाहत करणारा तो पृथ्वीचा पावन असे ठरते. आता परशुरामास अशा पावनांची म्हणजे क्षेत्र निवासक्षम करणाऱ्यांची जरूरी लागली तेव्हा या लोकांना कोणती संज्ञा प्राप्त होणार? अर्थात भूमिपावन किंवा एतादृश अशी दुसरी संज्ञा लावण्यात येणार, म्हणून क्षितिपावन हा शब्द येथे विशेष समर्पक दिसतो.

भूमि साफ करणे म्हणजे ती वसाहतीस योग्य करणे. 'क्षि' धातूचा अर्थ वसणे व क्षितिचा अर्थ जिच्यावर वसति करतात ती असा आहे. यमक्षय म्हणजे यमाचे वसतिस्थान.

येथे क्षिति हा शब्द आपणास योग्य दिसतो, तोच पावन याशी समस्त होऊन क्षितिपावन अशी संज्ञा बनली व तिचा अर्थ जमीन साफसूफ करून तिला क्षिति म्हणजे वसतिक्षम प्रदेश बनविणारा असा ठरतो. याप्रमाणे परशुरामाच्या साथीदार ब्राह्मणास लावण्यास क्षितिपावन ही संज्ञा अन्वर्थक ठरते. रचनादृष्ट्या हिचा संबध चित्तपावन ह्या शब्दाशी जुळतो. क्षेत्रसिंह याचे रूपांतर क्षेतसिंग, चेतसिंग. लक्ष्मण याचे लचमण या धर्तीवर क्षचा च बनून क्षितिचे रूपांतर चिति असे झाले; पुढे छोटिका-चुटकी या धर्तीवर क्षितिचे जागी चिति आले. तात्पर्य क्षितिपावन म्हणजेच चित्तपावन.

यावर करले येथील श्री. महादेव विठ्ठल लिमये यांनी पुढील मत व्यक्त केले आहे.

श्री. गो. कृ. मोडक यांनी पावन ह्या शब्दातील 'पू' ह्या धातूचा अर्थ शुद्ध करणे, खणणे, चोखाळणे असा घेऊन क्षितिपावन हे नांव चित्तपावन याचेशी अन्वर्थक आहे असे सिद्ध केले आहे. आता पावन या शब्दातील 'पू' या धातूपासून 'पावक' म्हणजे अग्नि हाहि शब्द सांधलेला आहे, त्याअर्थी 'पू' धातूचा 'जाळणे' हा अर्थ घेऊन क्षितिपावन ह्या शब्दाचा अर्थ कसा होतो ते पाहू.

आपणास हिंदू हे नाव प्रथम बाहेर देशच्या लोकांनी दिले व नंतर आम्ही आपणास हिंदू म्हणवू लागलो. त्याचप्रमाणे क्षितिपावन किंवा चितिपावन किंवा

चित्पावन असे बाहेरचे प्रथम लोक आम्हास म्हणू लागले असले पाहिजेत, ते का तर ते आमच्या बाह्य विशिष्ट लक्षणावरूनच म्हणत असले पाहिजेत.

कोकणची व देशावरील शेती यात प्रामुख्याने दिसणारा जर कोणता भेद असेल तर कोकणातील जमीन धान्य पेरण्यापूर्वी भाजून म्हणजे जाळून पोळून शुद्ध म्हणजे पावन करावी लागते आणि देशावरील जमिनीची भाजावळ करावी लागत नाही हा आहे. देशावरील कोणीही माणूस घाटाखाली फाल्गुन महिन्यापासून वैशाखापर्यंत केव्हाही आल्यास त्यास कोकणातील जमिनीच्या भाजावळीचे काम हा एक कौतुकाचा विषय होऊन बसेल. चिपळूणसारख्या विस्तीर्ण भातशेतीच्या प्रांतात तर परठिकाणच्या माणसाला तो कौतुकाचा विषय रहात नसून त्रासदायक व गुदमरून टाकणारा प्रकार वाटू लागतो; त्यावेळी तेथे जिकडे तिकडे जमिनीच्या भाजावळी चालू असल्याने दाही दिशा धुराने भरलेल्या असतात व सूर्याच्या उन्हाने व भाजावळीच्या उष्णतेने मनुष्य होरपळून जातो. म्हणून पुर्वीच्या काळी देशावरील लोकांचा कोकणाशी संबंध मुख्यतः कुंभार्ली घाटातून चिपळूणमार्गे येत असल्यामुळे देशावरील लोकांच्या मनात कोकणच्या माणसाविषयी जी गोष्ट पक्की लक्षात राहिली असेल ती ही की ते जमिनीत बी पेरण्यापूर्वी जमीन जाळतात आणि चिपळूण या शहराविषयी जी गोष्ट त्यांना लक्षात ठेवली असेल ती ही की, तेथे जमीन जाळली पोळली जाऊन ती त्यायोगे शेतकीस तयार केली जाते. चितिपावन म्हणजे कोकणस्थ रहिवासी व चित्पोळण ( चिपळूणचे जुने नाव ) म्हणजे कोकणचे मुख्य गाव ही नावे जमिनीचा भाजावळ करण्याच्या क्रियेमुळे उत्पन्न झालेली आहेत असे आमचे मत आहे. अर्थातच क्षितिपावन या शब्दाचा प्रथम शोध लावण्याचे श्रेय आम्ही श्री. गोविंद कृष्ण मोडक यांसच देतो. मात्र वर सुचविलेल्या नवीन व्युत्पत्तिची कल्पना आमची आहे असे श्री. महादेव विठ्ठल लिमये, करले हे म्हणतात.

इ. स. १९३८ मध्ये, रा. सा. ना. गो. चाफेकर, बदलापूर यांनी 'चित्पावन' नांवाचा स्वतंत्र ग्रंथ लिहून तो प्रकाशित केला. त्यांनी मुख्यतः कुलस्वामीवर आधारित असे संशोधन केले आहे व चित्तपावनांची आडनावे, ग्रामदेवता, कुलाचार चित्पावनी भाषा इत्यादि अनेक विषय त्यात चर्चिले आहेत. केवळ तर्कावर आधारित अशीहि बरीच विधाने त्यात दिलेली आहेत, ती अनेकांना मान्य होण्यासारखी नाहीत. तथापि ' चित्तपावन ' ज्ञातीसंबंधीच्या माहितीत या ग्रंथाने मौलिक भर पडली आहे. सन १९६६ मध्ये पुस्तकाची सुधारित अशी दुसरी आवृत्तीहि प्रसिद्ध झाली आहे. त्यात विशेषतः डॉ. पुसाळकर यांनी प्रसिद्ध केलेल्या 'वाडेश्वरोदय महाकाव्याचा' परामर्श घेतला आहे, त्याचा सारांश असा—



हे काव्य शके १५७५ त (सन १६५३) लिहिलेले आहे. ते शिवकालीन आहे. काव्यकर्ता विश्वनाथ हा कौशिक गोत्री गुहागरचा रहिवाशी. लेखकाचे नाव राम. डॉ. पुसाळकर यांचे मते हा राम म्हणजेच परशुराम होय.

ह्या काव्यांत चित्तपावन ब्राह्मणांना "चित्तप ब्राह्मण" या संज्ञेने उल्लेखिले आहे.

"तमेत्य चित्तपा विप्राः प्रार्थयामासुः" (सर्ग ८ श्लोक १४)
"त इमे चित्तपा विप्राः कृपापात्राणि तन्मुनेः" (श्लोक ४४)
"यत्रार्या ब्राह्मणाः पुण्याश्चित्तपा भार्गवप्रिहाः" (सर्ग १३ श्लोक ७१)

त्यावरून चित्पावन हें पूर्वी "चित्तप" नावाचे ब्राह्मण होते असे दिसते. यावरून चित्तप+अवन=चित्तपावन अशी व्युत्पत्ति संभवते. (Land defended or protected by the Chitpavans.) चिपळूणचे जुने नांव 'चित्तपोलन" असे सह्याद्रिखंडात आले आहे. पुढे विश्वनाथ कवि लिहितो की श्रीधराने चित्तप ब्राह्मण गुहागरात आणले. 'आनीय चित्तपान् विप्रान् याज्ञिकान् वेदपारगान्" अर्थात कोठून ? परशुराम क्षेत्राहून म्हणजे चिपळूणहून. ह्यावरून चित्तप विप्रांची वसति प्रथम चिपळूणची असून ती किमान ३००० वर्षांपूर्वीची असली पाहिजे असे अनुमान निघते.

"चित्तप" हा शब्द इजिप्तचे मराठी रूप, इजिप्तचे–इजिप्तहून आणलेले विप्र असाहि त्याचा अर्थ होऊ शकेल. प्राचीनकाळी कोकण किनाऱ्यावर इजिप्त अरबस्थान यांचे मोठे दळणवळण चालू होते व व्यापारहि चालत असे इजिप्तच्या लोकांच्या काही चालीरीतीही आम्ही उचलल्या असे समाजशास्त्रज्ञ सांगतात. गुहागरास मोठी अश्वशाला होती आणि हे घोडे अर्थात अरबीच असले पाहिजेत कारण कोकणात घोड्यांची पैदास होत नाही भारताच्या पश्चिम किनाऱ्यासमोर इराण, इजिप्त, अरबस्थान हे देश येतात. आपल्याकडे देवदेवींची देवळे आहेत तशीच मेसापोटेमिया इजिप्त याहि देशांत होती. देवाच्या स्थापनेला मगी ब्राह्मणच लागतात, मगी हे पारशांचे ब्राह्मण होत आपल्याकडील मूर्तिविचार तिकडूनच आला असल्याचाहि संभव आहे. देवळाच्या पुढे पोखरण (लहान कुंड किंवा तळे) बांधण्याची चालहि तेथूनच इकडे आली असावी.

ह्या काळात कलियुगाला आरंभ झाला हे ओळखून परशुराम गुप्त झाला असे म्हटले आहे. कलियुगाला आज ५०७० वर्षे झाली ही पौराणिक गणना जमेस धरली तर चिपळूणची वसाहतकार म्हणजे पाच हजार वर्षापूर्वीची आहे असे म्हणता येईल व त्याकाळी परशुरामाने परशुरामक्षेत्रात चित्तपावनांची वसाहत केली असावी असा तर्क निघतो.

सारांश धर्मच्छलामुळे पारशी लोक संजानला आले, यहुदी लोक अलिबागेस आले, तसें चित्तपावन लोक चिपळूण येथे येऊन थडकले असें मत कै. ना. गो चाफेकर यांनी 'चित्तपावन' द्वितीय आवृत्ति पृ. २५७ वर दिले आहे.

कोकणच्या शेतीचे मुख्य वैशिष्टच म्हणजे कोकणात जमीन नांगरून त्यात बी पेरण्यापूर्वी जमिनीच्या तुकड्याची भाजावळ करावी लागते व त्यामुळे ती जमीन निर्जंतुक म्हणजे शुद्ध किंवा पावन होते हाच पूर्वीच्या काळी "क्षितिपावन" विधि असावा. क्षिति म्हणजे पृथ्वी म्हणजे जमीन प्रथम पावन करून बी पेरणारे ते क्षितिपावन ऊर्फ चित्तपावन लोक होत. बी पेरण्यापूर्वी प्रथम चित्यग्नीने क्षिति म्हणजेच जमीन पावन करून घेणे हा पूर्वी एक महत्वाचा धार्मिक विधि असावा. हा विधि करून बी पेरणारे लोकांना क्षितिपावन उर्फ चित्तपावन लोक असे नाव पडले असावे असा माझा तर्क आहे. हे चित्तपावन, लोक ज्याठिकाणी आपली पहिली वसाहत करून राहिले त्या भागास चितिपोलन चित्तपोलन ऊर्फ चिपळूण असे नाव पडले. हृया अग्निचयन करणाऱ्या म्हणजे अग्निहोत्री ब्राह्मणास यज्ञाचे कामी यजमान पत्नी अवश्य लागते. कदाचित चित्तपावन पुरुषच प्रथम बहुसंख्येने कोकणात आले असावेत आणि येथे आल्यावर पुरेशा स्त्रियांच्या अभावी जोगाईचे आंब्याहून त्यांनी काही स्त्रिया आणून त्यांच्याशी विवाहसंबंध केले असावेत. यामुळे हृया विवाहित स्त्रियांनी आंब्याची जोगाई ही आपले माहेरची कुलस्वामिनी विवाहोत्तर पतिकुलांत समाविष्ट केली. व यामुळे आंब्याची जोगेश्वरी ही काही चित्तपावन कुटुंबातून कुलस्वामिनी समजली गेली असावी असा काहींचा तर्क आहे.

"चित्तपावन" जातीसंबंधी डॉ. सौ. इरावती कर्वे यांनी कांही संशोधन केले आहे. पूर्वी सर्व ब्राह्मण मिळून एक जात आणि त्यांतील चित्तपावन, देशस्थ व कऱ्हाडे इ. जातींना "पोट जाती" असे शब्द वापरले जात, त्याचा अर्थ असा की "एका मोठ्या ब्राह्मण जातीपासून महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या जाती बनल्या. परंतु ही ही गोष्ट खरी नाही. ह्या पोटजाती नसून प्रत्येक जात ही विशिष्ट गुणधर्म असलेली स्वतंत्र Endogamous अशा पृथक जात असल्यामुळे त्यास पोट जाती समजणे चूक आहे, म्हणून असे म्हणणे टाळले पाहिजे" असा त्याचा निष्कर्ष आहे.

मुंबईच्या टाटा हॉस्पिटल मधील सुप्रसिद्ध जंतुशास्त्रज्ञ डॉ. व्ही आर. खानोलकर, एम्. डी. यांनी पश्चिम महाराष्ट्रातील नागर, देशस्थ, चित्तपावन. चां. कायस्थ प्रभु व मराठा या जातींतील लोकांसंबंधी विशेष संशोधन केले व त्यावर "Genetic Variations in people of Western India, Bombay" हृया नांवाचा प्रबंध 'इंडियन जर्नल ऑफ मेडिकल सायन्स' या नियतकालिकांत (मे १९५५ पृ. १९९) प्रसिद्ध झालेला आहे. त्यांचाही निष्कर्ष असा आहे कीं महाराष्ट्रातील वरील जाती ह्या जीवशास्त्रीय दृष्टीने विशिष्ट, स्वतंत्र व काहीशा भिन्न गुणधर्मांच्या असून त्या एकमेकीपासून अलग अशा स्वतंत्र जाति आहेत.



डॉ. सौ. इरावती कर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. कैलासचंद्र मेहरोत्रा ऊर्फ मलहोत्रा यांनी यांच विषयावर विशेष संशोधन केले असून १९६६ साली त्या विषयी एक प्रबंध पुणे विद्यापीठास सादर करून पीएच्. डी. पदवी मिळविली आहे. ह्या संशोधना करिता श्री. मलहोत्रा यानी महाराष्ट्रीय ब्राह्मण जातीपैकी (१) चित्तपावन (२) देशस्थ ऋग्वेदी (३) कऱ्हाडे (४) सारस्वत (५) देवरुखे (७) माध्यंदिन (७) कण्व (८) चरक हृया आठ जातीं घेतल्या होत्या. त्यांच्या संशोधनाचा निष्कर्ष डॉ. सौ. कर्वे यांच्या संशोधनास पूरक असाच ठरला आहे, म्हणजे महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या पोटजाती हृया खऱ्या अर्थाने पोटजाती नसून त्या Biologically and Genetically पृथक व विशिष्ट गुणधर्मांच्या अशा निरनिराळचा जाती आहेत. प्रत्येक जातींचा कांही स्वतंत्र वैशिष्टचे आहेत.

इतर ब्राह्मण जातींबरोबर तुलना करून चित्तपावन ब्राह्मणांचे वैशिष्टच त्यानी खालीलप्रमाणे मांडले आहे.

(१) चित्तपावन ब्राह्मणांत इतर जातीपेक्षा गौरवर्णीय व उजळ वर्णाचे प्रमाण अधिक असते.

(२) हिरवट, निळसर किंवा घाऱ्या डोळचाचे प्रमाण चित्तपावनांत सुमारे १२ टक्के असून हे प्रमाण इतर जातींपेक्षा सर्वात अधिक आहे.

(३) आखूड केसांचे (low wave hair) प्रमाण इतरांपेक्षा अधिक म्हणजे ७० टक्के असून हृचांच्या केसाचा रंग पिंगट रंगावर आहे अगदी काळा नाही.

(४) डोळचाचे बुबुळ चमकदार असून (Rayed Iris) हे प्रमाण ८२ टक्के आहे.

(५) कानाची पाळी सुटी असलेले ५९ टक्के लोक आढळतात.

(६) उंची सर्वसाधारणपणे १६४६·१८ मिलिमीटर आहे.

(७) डोक्याची लांबी १८६·२२ मिलिमीटर आहे.

(८) डोक्याची रुंदी १४६·६१ मिलिमीटर आहे.

इतर मापे :–

Cephalic Index ७८·८३ मि. मी.

Alveolar height १२२·९५ मि. मी.

Length height Index ६६·२७ मि. मी.

Breadth height Index ८४·०७ मि. मी.

(९) कपाळाची रुंदी १०७·४० मि. मी. असून कपाळ सरळ पण फार रुंद नाही असे.

(१०) इतर गुणधर्म त्यांच्याच शब्दात खाली दिले आहेत.

" The incidence of Alveolar Prognathism is very low (8%).

High freqnency of Bloodgroup " O " (51%) Highest Rate.

Low frequency of Bloodgroup " B " (18%) Lowest Rate.

Frequency of Bloodgroup " M " (50%) is Rather High.

Frequency of Bloodgroup " N " (11%) is Rather Low.

Frequency of Rh Phenotype CC Dee (R1 R1) is lowest (30% )

Cc DEe (R1 R2) } are well
Cc Dee (R1 r) } represented

Frequency of the Chromosome CDe (R1) is high.

(11) Incidence of the " Colour Blindness" is rather highest (8.58%).

(12) The presence of Hypertrichosis is minimum. (only 3%).

" वरील एकूण गुणधर्मांचा व त्यांतील निरनिराळ्या वैशिष्टयांचा विचार केला असतांना, चित्तपावन, सारस्वत, कऱ्हाडे व चरक हे एकमेकापासून व इतरांपासून अजिबात स्वतंत्र असे जन्मजात गट दिसतात. (No Close Biological relationship) आणि देशस्थ ऋग्वेदी, माध्यंदिन, कण्व व देवरुखे या चौघांत त्या मानाने Close affinity आढळून येते आणि म्हणून ह्या चार जाति पूर्वी कदाचित् एका गटाच्या असण्याचा संभव वाटतो." असा निष्कर्ष जीवशास्त्राच्या व इतर शास्त्रींय कसोटया लावून डॉ. मलहोत्रा यांनी काढला आहे.



# ४. चित्पावन ब्राह्मणांचे विशेष कुलाचार

## कुलधर्म आणि कुलाचार

गौरी गणपति, नवरात्र, दसरा, होळी इत्यादी कुलाचार सर्वच हिंदुधर्मीय लोक प्रतिवर्षी पाळतात तथापि खाली वर्णन केलेले तीन कुलाचार हे चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणांचे वैशिष्टच आहे.

### १. देवदिवाळीस नैवेद्य अर्पण करणें

चित्पावन ब्राह्मणांव्यतिरिक्त मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेचे महत्व अन्य कोणास नाही. ' मासांना मार्गशीर्षोऽहम् ।। असे भगवान गीतेत सांगतात. सर्व मासांत मार्गशीर्ष मास हा श्रेष्ठ. त्यास विष्णुमास असे म्हणतात. एके काळी मार्गशीर्षात वर्षारंभ होत असे. ह्या महिन्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे शुद्ध प्रतिपदेस देव-दीपावली असे नांव आहे. त्या दिवशी सर्व चित्पावन ब्राह्मण आपल्या कुलदेवता, ग्रामदेवता, इष्टदेवता व उपास्यदेवता यांना महानैवेद्य अर्पण करण्याचा कुलाचार पाळतात. त्यास नैवद्य घालणे असे म्हणतात. मुख्य देवतांचे नैवेद्य स्वतंत्र पानावर व एका गावातील देवतांना एका पानावर त्यांच्या संख्येइतक्या मुदा व पक्वान्न वाढून हे नैवेद्य मांडतात. त्यासाठी वडे घारगे हे मुख्य पक्वान्न करावे लागते सर्व देवतांना एकाच वेळी नैवेद्य दाखवितात. कुळदेवतेचा नैवेद्य घरात घेतात व शंकराचा व इतर ग्रामदेवतांचे नैवेद्य घरात स्वीकारीत नाहीत. ते बाहेर देतात अगर गाईस देतात. देवदिवाळीस जमले नाही तर सोईच्या दुसऱ्या कोणत्याही दिवशी नैवेद्य कधी कधी घातले जातात.

या कुलाचारामुळे आपणांस आपला कुलस्वामी, कुलदेवता व ग्रामदेवता यांचे स्मरण होते. आपला मूळ गाव आठवतो व त्यानंतर आपल्या घराण्यातील मंडळींचे स्थलांतर कोठे व कसकसे होत गेले याचा बोध होतो. वर्षातून एकदा या नैवेद्यसमर्पणाचे निमित्ताने ही आठवण जागृत ठेवणे हा या कुलाचाराचा हेतु आहे.

### २. बोडण भरणे

बोडण हा शब्द संस्कृत ' वर्धन ' या शब्दापासून झालेला आहे. आपल्या कुटुंबात वृद्धि झाल्यानंतर म्हणजे घरात मंगलकार्य व प्रसूति झाल्यानंतर बोडण भरतात. घरांत गाय व्यायली असतांनाही कांही कुटुंबातून बोडण भरण्याची चाल आहे. कांही मोठया कुटुंबातून प्रतिवर्षी बोडण भरतात. गौरीहराचे वेळी पूजिलेली देवी अन्नपूर्णा (पार्वती) नववधू आपल्या बरोबर पतिगृही नेते. ही देवी नववधूवर

कृपादृष्टी ठेवून तिची संकटे निवारण करते व तिचा संसार वाढीस लावते, म्हणून तिच्यापासून वंशवृद्धी झाली म्हणजे त्याची सांगता करण्यासाठी बोडण भरण्याची चाल पडली आहे. घरची मुख्य सुवासिनी स्त्री किंवा नववधू, कुटुंबाबाहेरच्या तीन पुत्रवती सुवासिनीं व एक कुमारिका अशा पांच स्त्रियांनी मिळून बोडण भरावयाचे असते. ह्या विधीच्या वेळी आणखी एक सुवासिनी साहाय्यक म्हणून निराळा बोलाविली जाते. प्रथम देवीची पंचामृती पूजा करतात, नंतर देवास बसण्यासाठी व टेकण्यासाठी कणकेचा पाटा वरवंटा तयार करून तो परातीत ठेवतात व त्यावर देवीची स्थापना करतात. तिला कणकेचेच अलंकार वहातात. नंतर देवीची पूजा करून तिला पांच नैवेद्य अर्पण करतात. त्यावेळी चार नैवेद्य देवीपुढे परातीत ठेवतात व एक नैवेद्य जो कुमारिकेने घ्यावयाचा असतो तो परातीबाहेर निराळा दाखविला जातो (तो मागाहून भोजनाचे वेळी कुमारिकेस दिला जातो). नैवेद्या-नंतर कणकेचे बनविलेले पाच दिवे लावून देवीची आरती करतात व हे पांच दिवे पूर्वी परातीत ठेवलेल्या नैवेद्यांचे पानांवर ठेवतात नतर सर्व सुवासिनी मिळून त्यावर दूध शिंपडून ते विझवितात. नंतर देवीवर आणखी दहीदूध घालून ते सर्व त्यांतील देवीसह एकत्र 'बोडण' म्हणून कालवितात व देवी तृप्त झाली कां असे त्यांतील कुमारिकेस विचारतात. तिने होय म्हणेपर्यंत त्यांत आणखी दहीदूध घालून बोडण कालवावे लागते. देवी तृप्त झाल्यानंतर त्या बोडणाचा काहीं भाग देवीचा प्रसाद म्हणून कुटुंबातील सर्व मंडळींस अंगारा म्हणून लावतात. नंतर बोडणांतील देवी बाहेर काढून स्वच्छ धुवून पुसून तिचे तोंडास साखर लावून ती परत घरच्या देवात आपल्या जागी ठेवून देतात. नंतर कालविलेल्या बोडणाचा कोणताही भाग अपवित्र ठिकाणी पडू नये म्हणून सुवासिनी आपले हात त्याच परातीत, हाताला पुरण लावून स्वच्छ धुतात (नंतर ते सर्व मिश्रण गाईस घालून टाकतात). तदनंतर निमंत्रित सुवासिनींची ओटी भरून सर्व मंडळी भोजनास बसतात. **गर्भवती स्त्रीने या विधींत कोणताही भाग घ्यावयाचा नसतो.** श्रीदेवीचे कृपेने वंशवृद्धि होऊन कुटुंबाची वाढ झाली त्या प्रीत्यर्थ तिचे पूजन करून तिला संतुष्ट करणे हा या कुलाचाराचा हेतु आहे.

### ३. श्री महालक्ष्मीचे व्रत

विवाहापासूनची पहिली पांच वर्षेपर्यंत नववधूने हे व्रत पाळावयाचे असते. आश्विन शुद्ध अष्टमीस सकाळी प्रथम खड्यांच्या देवीची पूजा करतात. खड्यांची संख्या आपआपल्या विवाहवर्षाप्रमाणे १ ते ५ पर्यंत घ्यावयाची. पूजेचे वेळी एक दुर्वांचा तंतू १६ गाठींचा व दूसरा तंतू रेशमाचा घेतात. रेशमाच्या तंतूस विवाह वर्षसंख्ये प्रमाणे तितक्या गाठी मारावयाच्या असतात. खड्यांच्या देवी



बरोबरच या दोन्हीही तंतूंची पूजा करतात. पूजेनंतर रेशमी तंतू मनगटात बांधतात. दुपारी तांदूळाच्या उकडीचा देवीचा मुखवटा बनवून तो एका कळशीच्या तोंडावर बसवून श्री महालक्ष्मीची स्थापना करतात व ह्या देवीपुढे सकाळी पूजिलेल्या खड्यांच्या देवी व दूर्वांचा तंतू ठेवतात. सायंकाळी श्री देवीस मूर्तीचा आकार देऊन ती वस्त्रे व अलंकार घालून सजवितात. नंतर देवीची पूजा अर्चा करून आरती करतात. आरतीनंतर घागरी फुंकण्याचा कार्यक्रम सुरू करतात. घागर फुंकण्यामुळे त्यांत प्राणसंचार होऊन देवी सचेतन होते असे समजतात. त्यावेळी कांही स्त्रियांच्या अंगात श्रीदेवीचा प्रादुर्भाव होतो व त्या घुमूं लागतात. त्यावेळी जमलेल्या सुवासिनींपैकी कोणी आपआपले प्रश्न विचारून देवीचा कौल घेतात. घागरी फुंकण्याचा कार्यक्रम संपल्यावर पहाटे देवीची आरती केली जाते व नंतर मनगटातील रेशमी तंतू देवीस वाहून हा विधी संपतो.

या प्रमाणे ही महालक्ष्मीची पूजा वर्षांत एकूण चार वेळा करावी लागते प्रथम आश्विन शुद्ध ॥ ८ स वरील प्रमाणे ती केली जाते. दूसरी पूजा आश्विन शु॥ १४, तिसरी पूजा वद्य ८ व चौथी पूजा आश्विन वद्य १४ या दिवशी आपल्या घरीच करावयाची असते, त्यावेळी देवीच्या मूर्तीची पूजा न करिता फक्त दूर्वांचा तंतू १६ कांडे असलेला घेऊन, त्याचीच पूजा श्री महालक्ष्मीची पूजा म्हणून करावयाची असते. याप्रमाणे विवाहापासूनची पहिली पांच वर्षे हे व्रत नूतन सुवासिनींनी पाळावयाचे असते.

कांही कुटुंबातून श्री महालक्ष्मीची पूजा स्वतःच्या घरी करावयाची नसते. अशावेळी ज्या ठिकाणी ही पूजा केली जाते त्या ठिकाणी स्वतः जाऊन ही पुजा करावयाची असते. त्यासाठी निमंत्रणाची आवश्यकता नसते. पूजेचे साहित्य व दक्षिणा बरोबर न्यावयाची असते. दुपारचे भोजनही बहुधा त्याच घरी करतात म्हणून त्यासाठी लागणारा शिधाही न्यावा लागतो. **गर्भवती स्त्रीने पूजनांत भाग घ्यावयाचा नसतो.** श्री महालक्ष्मीच्या कृपाप्रसादाने नववधूस व तिच्या कुटुंबास ऐश्वर्य लाभावे यासाठी तिची उपासना करणे हा या कुलाचाराचा हेतु आहे.

वरील तिन्ही कुलाचार पाळणे हे चित्पावन ब्राह्मणांचे खास वैशिष्टच आहे. या कुलाचाराच्या संदर्भाने डॉ. सौ. इरावती कर्वे म्हणतात–

Both बोडण in honour of श्री पार्वती, and श्री महालक्ष्मी पूजा in honour of श्री लक्ष्मी, rituals seem to bear close analogy to the God-Eating Customs. They seem to be the counter part of Astarte or Ishtar of the Babylonians. The worship of महालक्ष्मी

has many parts of resemblance to the ancient ritual of the Aztees of America.

चित्पावनांखेरीज इतर ब्राह्मण जातीत वरील कुलाचार नाहीत.

(श्री. ना. गो. चापेकर, 'चित्पावन' आ. १ ली पृ. १७९) जर्मनीमध्ये वोडन (Woden) नावाच्या देवतेस भजतात. ही ट्युनिक जर्मन लोकांची देवता स्वस्तिक हे तिचे चिन्ह आहे. बोडण व वोडण ह्यांत उच्चारतादात्म्य आहे.

## ५. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील लेख

दातार घराण्यातील पूर्वजांनी आपापले वंशलेख आपल्या उपाध्यायांकडे ते क्षेत्राच्या ठिकाणी यात्रेच्या निमित्ताने गेले असता लिहून दिले आहेत व ते या सर्व उपाध्याय मंडळींनी आतापर्यंत जपून ठेविले आहेत हे त्यांचे या सर्व घराण्यांवर अपरिमित उपकार झाले आहेत. हे लेख उपलब्ध झाले नसते तर गेल्या ८।१० पिढ्यांची जी काही नावे आज मिळाली व वंशावळी जोडता आल्या, ते काम करणे शक्य झाले नसते. सध्याच्या सुशिक्षित मंडळींत असे लेख लिहून देण्याची प्रथा नाहीशी झालेली दिसून येते. पाश्चात्य लोकांत ते आपल्या 'फॅमिली बायबल' मध्ये आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या अशा सर्व कौटुंबिक गोष्टींची नोंद अगत्यपूर्वक लिहून ठेवतात व पिढ्यानुपिढ्या अशी माहिती रक्षण केली जाते. तशा प्रकारची काहीही योजना आपल्याकडे नाही किंवा त्याचे महत्वही आपणास वाटत नाही. सध्याच्या कुलवृत्तांत लेखनामुळे निदान गेल्या तीन शतकातील उपलब्ध माहिती कुलबंधूंच्या पुढे मांडता आली. यापुढील माहिती व्यवस्थित लिहून वेळचे वेळी नवी नोंद करून ही अद्ययावत् माहिती लिहून ठेवीत जावी अशी सर्व कुलबंधूंना विनंति आहे.

खालील उपाध्यायांकडील लेख आम्हास उपलब्ध झाले. (१) श्री. रा. गो. घैसास (२) श्री. पाटणकर (३) श्री. के. वा. फडके (४) श्री. भा. धों. फडके व (५) श्री. उपासनी.

याप्रमाणेच इतर नासिक, घृष्णेश्वर, गोकर्ण, महाबळेश्वर, काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रांतील उपाध्यायांकडे लेख आहेत परंतु आम्हास ते मिळविणे जमले नाही. त्या त्या ठिकाणच्या कुलबंधूंनी मनावर घेऊन त्याच्या नकला करून जरूर पाठवाव्या म्हणजे त्यांचा अंतर्भाव पुढे पुरवणी ग्रंथ काढतेवेळी अवश्य होईल.



घराण्याचे माहितीत त्या त्या घराण्याचे सर्व लेख प्रथम देऊन नंतर त्या लेखांवरून व इतर माहितीवरून झालेली त्या घराण्याची वंशावळ दिली आहे. देणारे व्यक्तीचे मूळ गांव तसेच लेख लिहिणे वेळचे त्याचे राहण्याचे गाव यांची माहिती असल्याने त्या घराण्यातील व्यक्तीचे स्थलांतर कसे होत गेले ही महत्वाची माहिती उपलब्ध होऊ शकते. तशी ती नुसत्या वंशावळी देण्याने होत नाही म्हणून हे लेख पूर्णपणे दिले आहेत.

लेखात लेख लिहिणारे व्यक्तीचे नांवापुढे वंशावळीप्रमाणे पिढीचा आकडा दिला आहे.

लेखांचे सुरवातीस दिलेला पहिला आकडा उपाध्यायाकडील वहीचा क्रमांक व दुसरा त्या नोंदीचा पृष्ठांक दाखवितो.

## ६. वंशावळी आणि वृत्तांत.

दातार आडनावाची घराणी चित्पावन व देशस्थांत वासिष्ठ ऋग्वेदी, वासिष्ठ यजुर्वेदी (हिरण्यकेशी), शांडिल्य, भारद्वाज व कपिलस या गोत्रांची आढळली. वंशावळी प्रमाणे ज्या व्यक्तींचा मूळ पुरुष म्हणून एक व्यक्ती दाखविता येते अशा सर्व व्यक्तींचा एक गट म्हणजे घराणे केले आहे. कांही व्यक्तींकडून जुन्या पिढ्यांची अगदीच त्रोटक माहिती मिळाल्यामुळे त्यांचा इतर पत्रकांतील माहितीशी संबंध जोडता आला नाही. यामुळे त्यांची स्वतंत्र घराणी करावी लागली आहेत.

या ग्रंथात गोत्रवार घराणी खालील प्रमाणे आहेत.

(१) वासिष्ठ ऋग्वेदी　१८
(२) वासिष्ठ हिरण्यकेशी　३९
(३) शांडिल्य　८
(४) भारद्वाज　२
(५) कपिलस　१

घराण्याच्या प्रास्ताविक भागांत मूळगांव व घराण्यातील मंडळींचे संक्रमण कोठे झाले ते सांगितले आहे. त्या नंतर कुलदेवता व कुलाचार दिले आहेत. इनाम, सनदा इत्यादि असल्यास त्यांचा उल्लेख केला आहे. कांहीं घराण्यातील मंडळींच्या संग्रही असलेल्या विस्तृत वंशावळी मिळाल्या. क्षेत्रांतील लेखांत काही अधिक व्यक्तींची नांवे सापडली, त्यांचा वंशावळींत समावेश केला आहे.

प्रत्येक घराण्याच्या आरंभी त्याला दिलेल्या नांवाखाली त्या घराण्यातील एकूण पुरुष व्यक्ति व माहिती आलेल्या व्यक्तींचे आकडे घातले आहेत. माहिती देताना घराण्याचा प्रास्ताविक भाग, लेख, वंशावळ आणि व्यक्तींचा वृत्तांत असा क्रम ठेवला आहे.

(१) वंशावळ मांडताना घराण्याचे नांव आरंभाच्या पृष्ठावर एकदाच घातले आहे

(२) मोठी वंशावळ मांडताना प्राय: डावे व उजवे पृष्ठ मिळून एक भाग कल्पिला असून अशा एका किंवा अनेक भागात ती मांडली आहे. मोठ्या वंशावळीतील सर्व पिढ्या एका पृष्ठावर मांडण्यास पुरेशी जागा नाही, ही अडचण जेथे आली, तेथे वंशावळीतील वरच्या कांही पिढ्यांचा एक विभाग स्वतंत्र पृष्ठावर दिला आहे.

(३) पिढ्यांचे आकडे वंशावळीच्या दोन्ही बाजून दिले असून जेथे लहान वंशावळ एकाच पृष्ठावर दिली आहे, तेथे पिढ्यांचे आकडे केवळ एका बाजूस घातले आहेत.

(४) जी वंशावळ अनेक भागात मांडावी लागली तिच्या पहिल्या भागांत आरंभाच्या सर्व पिढ्या एकदा दिल्या आहेत. पुढील भागांत अवश्य असलेल्या पिढीपासून प्रारंभ केला असून त्यापूर्वीच्या पिढ्या कंसात किंवा आडव्या रेषेत वरच्या जागा मांडल्या आहेत.

(५) बंधूंची नावे मिळालेल्या माहितीच्या आधारे प्राय: क्रमाने दिली आहेत. आवश्यक ठिकाणी क्रम दाखविण्याकरिता नावाच्या उजवीकडे क्रमांक घातले आहेत.

(६) ज्या व्यक्तीचा वंशविस्तार चालू असेल तेथे त्या व्यक्तीच्या सर्व बंधूंची नावे घातला आहेत. ज्या बंधूचा वंशविस्तार अगोदर दाखविला गेला त्याच्या नावापुढे वंशावळीतील त्याचा मागील पृष्ठांक घातला आहे.

(७) वंशविस्तार "वरून खाली" असा मांडिला असून पिता-पुत्र संबंध उभ्या रेघेला जोडून दर्शविला आहे. अनेक बंधू असल्यास त्यांची नावे आडव्या रेघेला जोडून तिला पिता-पुत्र संबंध दाखविणारी उभी रेघ जोडली आहे. वंश विस्तार थोडक्या जागेत राहून तो सहज आकलन व्हावा, यासाठी कांही ठिकाणी बंधूंची नावे एकाखाली एक अशी दिली असून पिता-पुत्र-संबंध दाखविणारी उभी रेघ केवळ वरच्या नावासच जोडली आहे. अशा ठिकाणी ही नावे एकाच पिढीतील आहेत हे दाखविण्यासाठी पिढीच्या आकड्याजवळ चौकटी कंस घातला आहे.



एकाखाली एक असणाऱ्या अनेक नावात जेथे उभी रेघ नसेल तेथे ते सर्व बंधू आहेत असे समजावे.

(८) ज्या व्यक्तीसंबंधी थोडीशी तरी माहिती उपलब्ध झाली अशा व्यक्तीच्या नावाच्या डाव्या बाजूस * ही खूण वंशावळीत केली आहे. इचात व्यक्तीच्या नावाखाली त्या व्यक्तीचे सध्याचे रहाण्याचे ठिकाण घातले आहे. एका कोठ्यातील अनेक व्यक्तींचा गाव एकच असल्यास तो एकदाच दिला आहे. गांव भिन्न असल्यास ते "वरून खाली" अशा क्रमाने मांडिले आहेत. एका कोठ्यातील व्यक्तींची नांवे अनेक असतील, तेथे मोठ्या व कर्त्या व्यक्तीचा गांव दिला आहे.

(९) व्यक्ति दत्तक आली असल्यास 'द आ' ही अक्षरे त्या नांवाजवळ कंसात घातली असून दत्तक गेली असल्यास "द. गे." अशी अक्षरे घातली आहेत.

(१०) वंशावळीनंतर घराण्यातील व्यक्तींचा वृत्तांत वंशावळीतील पिढीच्या अनुक्रमाने दिला आहे.

(११) एखाद्या चरित्र ग्रंथात व्यक्तीची माहिती जशी विस्तृत दिलेली असते तशी या ग्रंथात दिलेली नसून व्यक्तीचा जीवनक्रम समजेल अशा रीतीने थोडक्यात दिला आहे. पण कांही उल्लेखनीय व्यक्तींच्या बाबतीत त्यांच्या शैक्षणिक व इतर सामाजिक, औद्योगिक, राजकीय व सांस्कृतिक कार्यातील बाबींचा सविस्तर परिचय करून दिला आहे.

(१२) व्यक्तीच्या नांवामागे, श्रीयुत, चिरंजीव, सौभाग्यवती, श्रीमती इत्यादि उपपदे जोडली नाहींत.

(१३) घराण्यातील पुरुष व्यक्तीचे नांव ओळीच्या आरंभी जाड टाइपात दिले असून त्यापुढे पिढीचा आकडा कंसात दिला आहे.

(१४) माहिती आलेल्या दातार कुलातील पुरुष व्यक्तीच्याच नांवामागे वंशावळीत * ही खूण केली आहे. प्रत्यक्ष वृत्तांतवर्णनांत व्यक्तीच्या नांवामागे ही खूण केली नाहीं व भार्या व कन्या आणि भार्या पिता व कन्या-भ्रतार यांच्या नांवामागे तशी खूण घातली नाही.

(१५) दातार कुलातील पुरुष व्यक्तींचा जन्म, शिक्षण, व्यवसाय, वास्तव्य इत्यादी माहिती दिल्यावर भार्या व कन्या यांची माहिती दिली आहे. भार्या व विवाहित कन्या यांचे जन्मसन प्राय: दिले नाहीत. अविवाहित कन्यांचे जन्मसन घातले आहेत. भार्याचे माहेरचे नांव व कन्येचे सासरचे नांव कंसात घातले

आहे. कन्यांची माहिती त्यांच्या वडिलांच्या माहितीत दिली असून पुत्राची माहिती स्वतंत्र परिच्छेदांत दिली आहे.

(१६) ज्येष्ठबंधू व त्याचा वंशविस्तार यांची माहिती प्रथम देऊन नंतर धाकटचा बंधूची व त्याच्या वंशविस्ताराची माहिती दिली आहे.

(१७) वडील आपले नांव बाळाजी असे लिहीत असताही कित्येकांनी आपल्या वडिलांच्या बाळाजी या नांवाचा उल्लेख बळवंत, बल्लाळ किंवा बाळ असा केला आहे. असाच बदल विसाजी–विश्वनाथ, राघो–रघुनाथ, रामाजी–रामचंद्र, केसो–केशव, अंताजी-अनंत इत्यादि ठिकाणी केलेला आढळतो.

(१८) सामान्यत: उपनयनापूर्वी मृत झालेले पुत्र आणि विवाहापूर्वी मृत झालेल्या कन्या यांची माहिती दिली नाही.

(१९) व्यक्तीच्या माहितीत जन्म व मृत्यू यांचे दिलेले आकडे इसवी सनांत दिले आहेत जेथे शक किंवा संवत असेल तेथे त्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

## ७. मूळ गांव

निरनिराळ्या घराण्यांनी आपली जी मूळ गांवे सांगितली त्यासंबंधीची माहिती त्या त्या ठिकाणच्या मराठी शाळेच्या मुख्याध्यापकांकडून मागविण्यात आली. सर्व गावांची आली नाही पण जेवढ्यांची आली ती खाली वर्णानुक्रमे दिली तहेआ.)

**अक्षीनागांव**–ता–अलिबाग, जि–कुलाबा.

या जिल्हयाच्या ठिकाणापासून हे गाव तीन मैल असून बस वाहतूक आहे जवळचे बंदर रेवस अंतर १८ मैल. वाहन बस.

गांवची लोकसंख्या २०००. गावात पूर्णप्राथमिक शाळा आहें.

गावातील मुख्य दैवते श्री कालंबा देवी व लक्ष्मी-नारायण असून त्यांचे उत्सव आश्विन शु।। १ ते १० पर्यंत आणि रामनवमी चैत्र महिन्यात असे असतात. गावात चित्पावनांची २५ घरे असून, दातार, जोशी, पेठे, करमरकर, कर्वे, बर्वे, डोंगरे, भाटे, भिडे, शित्रे, भावे, केळकर अशी आडनांवें आहेत.

गावचा मुख्य व्यवसाय–बागायत शेती.



**अरवली**–ता–संगमेश्वर, जि–रत्नागिरी.

जवळचे मोठे गाव–चिपळूण १६ मैलावर असून बसची सोय आहे.

गावची लोकसंख्या सुमारे एक हजार असून एक प्राथमिक शाळा आहें.

गावातील मुख्य दैवत–श्री आदित्य नारायण याचा उत्सव वैशाख शु।। ५ पासून तीन दिवस असतो.

गावात चित्पावनांची घरे सुमारे वीस आहेत. हल्ली तेथे दातार कोणी रहात नाहीत. पाटणकर, खरे, परांजपे, करमरकर, रानडे ही इतर मंडळी आहेंत गावचा मुख्य व्यवसाय–शेती.

**आंजर्ले**–ता–दापोली, जि–रत्नागिरी.

जवळचे मुख्य गाव दापोली बारा मैलावर आहे. वाहनाची सोय बस आहें जवळचे बंदर हर्णै चार मैलावर आहे. मुंबईहून आठवडयातून चारवेळा बोट येते. बंदरापासून आंजर्ले गावापर्यंत बसची सोय आहे.

गावची लोकसंख्य २२५६ आहे. दोन प्राथमिक शाळा व एक हायस्कूल अशी शिक्षणाची सोय आहें. गावातील मुख्य दैवते–(१) श्री दुर्गादेवी. तिचे स्थान उभा घर (गावात) आहे (२) कडयावरील गणपति हे स्थान डोंगरावर आहे. त्यांचे उत्सव चैत्र शु व ।१ते ३ आणि माघ शु. ४ असे असतात गावात नित्सुरे जोशी, बापट, साठे, विद्वांस, कोकणे, काळे, बिवलकर वगैरे चित्पावनांची ८४ घरे आहेत. दातारांचे घर नाही. गांवचा प्रमुख व्यवसाय–बागायत शेती आहे.

**किहीम** ता–अलिबाग, जि–कुलाबा.

अलिबागपासून किहीमचे अंतर सहा मैल असून बसची सोय आहे. जवळचे बंदर रेवस नऊ मैलावर आहे. रेवस-किहीम एस् टी. बसची सोय आहे

गावची लोकसंख्या अदमासे दीड हजार असून, गावात प्राथमिक व इंग्रजी शिक्षणाची सोय आहें. श्री चामुंडा देवी हे गावचे मुख्य दैवत व तिचा उत्सव नवरात्रात असतो. गावात दातार, कर्वे, भिडे, भातखंडे, बर्वे, भागवत वगैरे चित्पावनांची घरे आहेत. श्री देवीचे स्थान जागृत आहे अशी आख्यायिका आहें.

गावचा मुख्य व्यवसाय शेती. दातार घराणी तो व्यवसाय परंपरागत करतात शिवाय व त्यापैकी काही कुक्कुटपालन व दुग्ध व्यवसायही करतात.

**कोंढावणे**–ता. कर्जत, पो. कोंदिवडे, जि. कुलाबा.

कोंदिवडे गावापासून कोंढावणे दोन किलोमीटर अंतरावर असून प्रवास पायी करावा लागतो. गावची लोकसंख्या १८७ आहें. एक प्राथमिक शाळा आहे गावात

कोळजा देवी, सोमेश्वर, मारुति, गणपति ही मुख्य दैवते असून त्यांचे उत्सव नवरात्र, हनुमान जयंति व माघ शु॥ ४ यावेळी होतात.

या गावी दातार आणि गोगटे यांची घरे आहेत. दातारांची घरे तीन व त्यांचा व्यवसाय शेती आहे. या गावाचे पूर्वेस एक डोंगर असून त्यावर एक किल्ला आहे. त्याला राजमाची किल्ला म्हणतात. जवळच कार्ल्याच्या लेणीसारखी एक लहान लेणी आहे. पुणे-मुंबई रेल्वे मार्गावर ठाकूरवाडी नावाचा गाव लागतो तेथे सर्व रेल्वे गाड्या थांबतात, पण स्टेशन मात्र नाही. या गावापासून कोंढावणे गाव तीन किलोमीटर अंतरावर आहे. बसने कर्जतवरून निघणारी गाडी खांडपे गावी येते. तेथून चार किलोमीटर अंतरावर कोंढवणे गाव आहे. हा प्रवास पायीच करावा लागतो. बसमार्गे आल्यास डोंगर अगर नदी आडवी येत नाही. रेल्वे मार्गाने आल्यास उल्हास नदी ओलांडावी लागते.

### गणपतिपुळे-ता जि. रत्नागिरी.

रत्नागिरी ते गणपतिपुळे रोज दोन बसेस येतात. तसेच मुंबई-गणपतिपुळे रोज तीन बसेस येतात. जवळचे मोठे गांव मालगुंड असून तेथून अंतर दोन मैल आहे. बैलगाडो किंवा पायी हा प्रवास होतो. तसेच जवळचे बंदर तिवरी हे असून त्याचे अंतर चार मैल आहे. वाहनाची सोय बैलगाडी.

गांवची लोकसंख्या सातशे असून एक पूर्ण प्राथमिक शाळा आहे. गावांतील मुख्य दैवत श्रीगणपति असून श्री चंडिका ही ग्राम देवी आहे. चंडिका देवीचे स्थान गावांत असून समुद्र किनारी श्रीगणपति मंदिर आहे. श्रीगणपति उत्सव भाद्रपद शु॥ १ ते ५ व माघ शु॥ १ ते ५ आणि श्रीचंडिकेचा उत्सव फाल्गुनांत असतो. गावांत दातारांचे घर नाही. इतर चित्पावांत-केळकर, शेंडये, धनवटकर, जोशी, भिडे, फाटक, बापट, कोल्हटकर, रानडे व पटवर्धन ही आडनांवे आहेत. या गावचे खोत भिडे याना संकटकाळीं दृष्टांत होऊन स्वयंभू मूर्ति प्रकट झाली. नंतर पेशवाईत या गांवची जास्त प्रसिद्धी झाली. येथील प्रमुख व्यवसाय शेती. वैदिक अध्ययनाची परंपरा येथे अद्याप टिकून आहे. वे. मू. मुरलीधरशास्त्री वासुदेव शास्त्री शेंड्ये यांचा महाराष्ट्र शासनातर्फे औरंगाबाद येथे शके १८९२ मध्यें उत्तम वैदिक म्हणून सत्कार झाला. ते घनपाठी आहेत.

### गुहागर-ता. गुहागर-जि.-रत्नागिरी.

मुंबई-गुहागर-पुणे गुहागर अशी बसची सोय आहे. जवळचे गांव चिपळूण हे २८ मैलावर आहे. जवळचे बंदर ९ मैल असून बसचीं सोय आहे.



लोकसंख्या सुमारे पांच हजार. गावांत दोन प्राथमिक शाळा व एक हायस्कूल अशी शिक्षणाची सोय आहे.

गावांत श्रीदुर्गा व श्री व्याडेश्वर ही मुख्य दैवते आहेत. त्यांचे उत्सव अनुक्रमे नवरात्र व शिवरात्रीस असतात.

श्रीदुर्गा देवीची स्थापना दातार घराण्यांतील वैदिक ब्राह्मण श्री वैजनाथभट्ट यानी केली असे उल्लेख आढळतात. त्याबद्दल देवीची पालखी निघण्याचे वेळी तसेच होळी पेटविणे पूर्वी दातारांच्या नांवाचा पुकारा होऊन पहिला मान त्याना दिला जातो

गावांत चित्पावनांची सुमारे १२५ घरे आहेत. त्यांत डॉ. प. अ. दातार हे एकच दातार कुटुंब आहे. इतर आडनावे-खरे, दामले, पटवर्धन, जोग, दीक्षित, सोहनी परचुरे, आठवले, जोशी, वझे, ओक, पेठे, गद्रे, कानिटकर, गाडगीळ, काणे वगैरे.

वरील दोनही देवालयांचा जीर्णोद्धार अलिकडे मोठ्या प्रमाणावर झाला आहे. हे गांव आनंदीबाई पेशवे यांचे माहेर. येथे सरदार फडके यांचा वाडा आहे. मुख्य व्यवसाय शेती, बागायत वगैरे.

### नांदिवडे-पो. जयगड जि. रत्नागिरी.

हे गांव जयगड बंदरापासून दीड मैल दूर आहे. वाहनाची सोय बैलगाडी. मोटारही येऊ शकते. जयगडला एस्. टी. ने किंवा बोटीने यावे लागते.

गांवची लोकसंख्या सुमारे १४०० असून पूर्ण प्राथमिक शाळा व हायस्कूल अशा शिक्षणाच्या सोयी आहेत. श्री चंडिका हे ग्रामदैवत व श्री. कऱ्हाटेश्वर, लक्ष्मी नारायण, जोगेश्वरी वगैरे इतर दैवते आहेत. श्री. कऱ्हाटेश्वर मंदिर समुद्र-काठी आहे. श्री चंडिका देवीचा उत्सव फाल्गुनांत शिमगी पौर्णिमेस असतो. गावांत दातार, बिवलकर, बापट, वैशंपायन, भिडे, दामले, वैद्य, काळे, केळकर, साठे, जोग वगैरे चित्पावनांची पंचवीस घरे आहेत. श्री. यशवंत दत्तात्रय दातार हे येथे रहात असून त्यांचा भिक्षुकीचा व्यवसाय आहे. नांदिवडे गावातील जोशी घराण्याचा हक्क त्यांचे घराण्याने खरेदी केला आहे.

नांदिवडे गावांत श्री. छत्रपति शाहु यांचे वेळेपासून वस्तीविस्तार झाला. नागरी भागावर कान्होजी आंग्रे यांचे अधिपत्य असताना नांदिवडे गावालगत देवगड किल्यावर सरदार बिवलकर घराणे उदयास आले. त्यांचे मूळपुरुष रामाजी महादेव बिवलकर यांचे चौसोपी वाड्यांतील पाया व तटबंदी अद्याप अस्तित्वांत आहे.

समुद्रकिनारी श्री कन्हाटेश्वर हे स्वयंभूशंकराचे देवस्थान आहे. सभोवार सृष्टी-सौंदर्य चांगले आहे. श्री. रामाजी महादेव बिवलकर यानी आपले वाड्यापासून थेट देवालयापर्यंत दगडी पाखाडी दोन मैल लांबीची बांधून दिली, ती अद्यापि सुस्थितीत आहे. बिवलकर यांची कुलदैवते श्री लक्ष्मीनारायण व जोगेश्वरी यांची देवालयेवरील श्री. बिवलकर यांनी बांधिली. सर्व बिवलकर घराणी ही देवस्थाने आपली मानतात. या गावांत दीपगृह, किल्ला व बंदर ही प्रेक्षणीय स्थळे मानली जातात.

यापूर्वी म्हणजे पन्नास वर्षापूर्वी येथे ५–६ घरे दातारांची होती, परंतु सध्या एकच आहे.

### पांचवड–ता. वाई–जिल्हा–सातारा.

जवळचे मोठे गांव वाई आठ मैल आहे व एस. टी. बसची वाहतूक चालू असते. गांवची लोकसंख्या दोन हजार आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत.

गांवची मुख्य दैवते नवलाई देवी, कज्जलेश्वर ही असून देवीचा उत्सव चैत्र व॥ ६ व श्री कज्जालेश्वर उत्सव माघ शु॥ १ ते पौर्णिमेपर्यंत असतो.

गावांत दातार, गोखले, दिक्षित, अभ्यंकर, भट, नातु, थत्ते अशी चित्तावनांची घरे आहेत. नातूंना हा गांव इनाम होता. गांवचा मुख्य व्यवसाय शेतीचा.

### मालगुंड–ता. व जि. रत्नागिरी.

गावांस येण्याचा मार्ग पुणे, चिपळूण, गणपतिपुळे वसने. तेथून अंतर चार फर्लांग. गांवची लोकसंख्या अंदाजे ५०००. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय आहे. गावांत श्री दत्त, राम, विठोबा, सोमेश्वर व चषकी (ग्रामदैवत) ही मुख्य दैवते आहेत. त्यांचे उत्सव, दत्तजयंति, रामनवमी हे असतात. गावात दातार, केळकर, बापट, जोशी वगैरे चित्पावनाची २५ घराणे आहेत. दातारांचे फक्त एकच घर आहे. मालगुंड हे कवि श्री. केशवसुत यांचे जन्मगाव असून त्यांचा ज्या श्री. फडके यांचे घरांत जन्म झाला ती वास्तु महाराष्ट्र राज्यामार्फत संरक्षित केली आहे. तिची व्यवस्था हल्ली मालगुंड एज्युकेशन सोसायटीकडे आहे.

गांवचा प्रमुख व्यवसाय–शेती व आंबे व्यापार हा आहे.

### गाव–वाडेपडेल. तालुका देवगड. जि. रत्नागिरी.

या गावी कोल्हापूर–विजयदुर्ग या एस. टी. बसने पडेल हुरशीपर्यंत येता येते किंवा आगबोटीने मुंबई–विजयदुर्ग असाही प्रवास करता येतो. विजयदुर्गहून वाडे–पडेलचे अंतर सात मैल आहे व एस्. टी ची सोय आहे.



लोकसंख्या अंदाजे तीन हजार आहे गावात तीन प्राथमिक शाळा व एक हायस्कूल आहे.

गावांतील मुख्य दैवते–श्रीदेव शंकरेश्वर, विठोबा, ब्रह्मदेव, बडची देवी, पावणाई ही असून त्यांची रथ ने गावातच आहेत. कार्तिक एकादशी पौर्णिमेपर्यंत श्रीशंकरेश्वराचा उत्सव असतो आणि विठ्ठल मंदिराश्राकतवण ादशीस उत्सव व असतो . गावात चित्पावनांची सुमारे २०-२५ घरे आहेत. त्यांची आडनांवे–दातार. मराठे, दामले, बोडस, देवधर, दीक्षित, रानडे अशी आहेत.

पडेलमध्ये पूर्वी विड्याची पाने प्रसिद्ध होती. गांवचा प्रमुख व्यवसाय शेती–पाणी मुबल्क असल्याने बागाईत भाजीपाला विशेष पिकतो.

### वेणगांव ता. कर्जत, जि. कुलाबा.

हे गाव मध्य रेल्वेच्या कर्जत स्टेशनपासून पूर्वेस सुमारे १।–१॥ मैल असून धाकटे वेणगाव म्हणून ओळखले जाते. धाकटचा वेणगावच्या पूर्वेस एक मैलावर मोठे वेणगाव म्हणून गाव आहे. पेशव्यांच्या पैकी 'भट' यांचा मोठा वाडा मोठ्या वेणगावात होता. फार पूर्वी आगींत त्याचा काही भाग जळून गेला. हल्ली मोठे वेणगावपेक्षां धाकटचा वेणगावची वस्ती जास्ती आहे.

स्टेशनपासून गावांत येण्यासाठी बैलगाडी हे वाहन, पण आगाऊ पत्र पाठवून सोय करावी लागतो.

गांवची लोकसंख्या ५००. प्राथानिक शाळा आहे.

गावातील मुख्य दैवते श्रीगणपती व मोठे व धाकटे वेणगाव याचे मध्ये गांव देवीचे देऊळ आहे. आश्विन नवरात्रांत देवीचा व माघांत गणपतीचा उत्सव असतो.

गावात चित्पावनांची सुमारे २० घरे : दातार, जोशी, वैद्य, काणे वगैरे आडनावे आहेत. त्यांत दातारांची तीन आहेत. यापैकी बरीचशी कुटुंबे नोकरी. व्यवसायानिमित्त परगांवी गेली आहेत.

गांवचा मुख्य व्यवसाय शेती, थोडा जोडधंदा म्हणन दुग्धव्यवसाय.

### हर्णे- सुरुड–ता दापोली, जि. रत्नागिरी.

जवळचे मोठे गाव दापोली अंतर ७ मैल. वाहनाची सोय एस्. टी. बसने. जवळचे बंदर हर्णै अंतर सहा मैल बसची सोय आहे गांवची लोकसंख्या सुमारे १८०० आहे. गावात मराठी व उर्दू प्राथमिक शाळा असून एक हायस्कूलही आहेरे

श्री दुर्गादेवी हे गावातील मुख्य दैवत. उत्सव चैत्र शु॥ १ तें नवमीपर्यंत असतो. गिावात दावलतार, जोशी,ऐोकर, भावे, काळे, कर्वे , गोडबोले वगै,

चित्पावनांची ७५ घरे आहेत. त्यात दातारांची तीन नांदती आहेत.

हा मूळ गांव कोणी सिद्धपुरुषाने वसविला, त्याची समाधि आहे. श्री. गानू वकील यांनी मुरुड गावचा सांस्कृतिक व ऐतिहासिक माहितीचे पुस्तक लिहिले आहे, त्यात गावासंबंधी सविस्तर हकीकत आहें हें गाव महर्षि अण्णासाहेब कर्वे भारतरत्न यांचे जन्मस्थान.

## ८. निधिसहाय्यकांची यादी, ग्रंथप्रकाशन व फोटोकरिता

दि. ३१-१-१९७४पर्यंतची जमा

वा. ऋ. – वासिष्ठ ऋग्वेदी, वा. हि. – वासिष्ठ हिरण्यकेशी
शां. – शांडिल्य, भा. – भारद्वाज, क. – कपिलस.

| रु. | नांव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १०४१ | „ नारायण गोविंद | वा. ऋ. | ९६ |
| १००१ | श्री. श्रीपाद वासुदेव | वा. हि. | १२७ |
| १००१ | कै. डॉ. कु. आशा लक्ष्मण दातार यांचे स्मरणार्थ श्री. लक्ष्मण गोविंद दातार यांचेकडून. | वा. ऋ. | १६८ |
| १००१ | श्री. यशवंत विठ्ठल व वसंत विठ्ठल | वा. हि. | ७७ |
| ५०१ | श्री. सदाशिव केशव. | वा. हि. | ८० |
| ४०० | „ व्यंकटाचल अंजनाचल | क. | ४२ |
| २५१ | श्रीमती पार्वतीबाई शंकर आघारकर. | वा. ऋ. | २२४ |
| २५० | श्री. वामन शंकर व बंधू. | वा. ऋ. | १०९ |
| २५१ | „ गोपिनाथ वासुदेव | वा. हि. | १२५ |
| २५१ | „ रविभूषण अनंत. | वा. हि. | २९६ |
| २५० | „ डॉ. गंगाधर शंकर. | वा. हि. | २४७ |
| २५० | श्री. अनंत विठ्ठल. | वा. हि. | ७५ |
| २५० | „ केशव ऊर्फ मुकुंद सदाशिव. | वा. हि. | ८२ |
| २६३-५० | „ चिंतामण वामन (आस्ट्रेलिया) | शां. | २४ |
| २०० | श्री. गणेश केशव | वा. हि. | २९९ |
| २०० | श्रीमती प्रमिलाबाई हरि व श्री. दत्तात्रय हरि | वा. ऋ. | ५६ |



| रु. | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १५१ | श्री. बाळकृष्ण नारायण | वा. हि. | १२५ |
| १५१ | श्री. दत्तात्रय वासुदेव | वा. हि. | ८६ |
| १५१ | „ श्रीधर हरि | वा. हि. | ५३ |
| १५१ | „ पांडुरंग मोरेश्वर | शां. | ३० |
| १५० | „ भगवंत नागेश हस्ते श्री. व्यंकटेश नागेश | क. | ३८ |
| १५० | „ श्रीधर विनायक | वा. हि. | १७२ |
| १०१ | श्री. जगन्नाथ विश्वनाथ ऊर्फ बंडोपंत दातार | वा. ऋ. | ३६ |
| १०१ | „ त्र्यंबक शंकर | वा. हि. | २६८ |
| १०१ | „ शिवराम केशव | शां. | ८२ |
| १०१ | „ वसंत दामोदर | वा. ऋ. | १५५ |
| १०१ | डॉ. अनंत रामचंद्र | वा. हि. | २७८ |
| १०१ | „ दत्तात्रय दामोदर | वा. ऋ. | १५६ |
| १०१ | „ दामोदर गोविंद | वा. ऋ. | ९६ |
| १०१ | „ श्रीपाद महादेव | वा. हि. | १७९ |
| १०१ | „ वसंत महादेव | वा. हि. | १७९ |
| १०१ | „ केशव कृष्ण | वा. हि. | २१७ |
| १०१ | „ मनोहर दामोदर | वा. ऋ. | १५६ |
| १०१ | „ गणेश गोपाळ | वा. हि. | ३३२ |
| १०१ | „ अच्युत गोविंद | शां. | ५० |
| १०१ | वैद्यराज आत्माराम वामन | शां. | ४७ |
| १०१ | श्री. गणेश दामोदर | वा. हि. | ३२५ |
| १०१ | „ मधुकर शंकर आगरकर | वा. ऋ. | २१६ |
| १०१ | , प्रभाकर विष्णु | वा. हि. | १३५ |
| १०१ | „ सुधाकर विनायक | संकीर्ण माहिती | ७९ |
| १०१ | श्री. लक्ष्मण गोविंद | वा. ऋ. | १६५ |

| रु. | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १०१ | सौ. निर्मला लक्ष्मण | वा. ऋ. | १६५ |
| १०१ | श्री. लक्ष्मण विष्णु | शां. | ५७ |
| १०१ | „ नारायण बाळकृष्ण | „ | ५७ |
| १०१ | श्रीमति गंगाबाई वर्तक | वा. ऋ. | १८९ |
| १०१ | श्री. व्यंकटेश कृष्ण फडणीस | वा. हि. | १०४ |
| १०१ | „ चंद्रकांत हरि | वा. ऋ. | ५६ |
| १०१ | „ सदाशिव शांताराम | वा. हि. | २९८ |
| १०१ | „ शिवराम केशव गोरे | „ | ८० |
| १०१ | „ व्यंकटेश वासुदेव<br>„ भालचंद्र वासुदेव<br>श्रीमती रमाबाई वासुदेव | „ | १२५<br>„<br>„ |
| १०१ | श्री. विठ्ठल श्रीपत | भा. | २२ |
| १२६ | „ गोविंद भार्गव आगरकर | वा. ऋ. | २१३ |
| १०१ | „ कृष्णाजी नारायण | शां. | २१ |
| १०१ | „ बळवंत महादेव | वा. हि. | २४४ |
| १४१ | „ विश्वनाथ जनार्दन ऊर्फ पिलोबा | „ | १०७ |
| १०१ | „ रामकृष्ण महादेव | „ | २२८ |
| १०० | श्री. त्रिंबक विश्वनाथ | शां. | ८० |
| १०० | „ दिनकर हरि | वा. ऋ. | ५६ |
| १०० | „ पांडुरंग वासुदेव | वा. हि. | १२६ |
| १०० | „ गोपाळ विनायक | वा. ऋ. | ५४ |
| १०० | डॉ. दिनकर श्रीपत | भा. | २४ |
| १०० | श्री. व्यंकटेश नागेश | क. | २८ |
| १०० | „ अशोक नारायण | वा. ऋ. | १६५ |
| १०० | „ नारायण भालचंद्र | वा. हि. | ६८ |
| १०० | „ दत्तात्रय श्रीधर | „ | १८५ |



| रु | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ९१ | डॉ. गोविंद सखाराम | वा. हि. | २२१ |
| ७५ | „ परशुराम अनंत | „ | २१८ |
| ७० | „ हरिकृष्ण महादेव | „ | १४४ |
| ५१ | „ विश्वनाथ विनायक | शां. | ८१ |
| ५१ | वैद्यराज सखाराम वामन | „ | १४ |
| ५१ | श्री. वैजनाथ विश्वनाथ | वा. ऋ. | ४० |
| ५१ | श्री. दत्तात्रय कृष्णाजी | „ | १३६ |
| ५१ | डॉ. मधुकर गोविंद | „ | २४३ |
| ५१ | श्री. भास्कर दत्तात्रय | „ | ८९ |
| ५१ | „ मोहनीराज शंकर | „ | ४२ |
| ५१ | „ जगन्नाथ विश्वनाथ | „ | ८२ |
| ५१ | „ हरि ऊर्फ जयंत दामोदर | „ | १५६ |
| ५१ | „ शरद महादेव | „ | ४७ |
| ५१ | „ काशिनाथ भास्कर | „ | ५८ |
| ५१ | „ पांडुरंग त्रिंबक सबनीस | „ | १६० |
| ५१ | „ रामकृष्ण पुरुषोत्तम | „ | १११ |
| ५१ | „ माधव विष्णु | वा. हि. | १३५ |
| ५१ | „ लक्ष्मण मुकुंद | „ | २३३ |
| ५१ | „ जगन्नाथ विष्णु | „ | १३५ |
| ५१ | „ दत्तात्रय रामचंद्र | शां. | ८४ |
| ५१ | प्राध्यापक अच्युत अनंत | भा. | १९ |
| ५१ | डॉ व्यंकटेश विठ्ठल | वा. हि. | १३२ |
| ५१ | श्री. श्रीकांत काशिनाथ | „ | १३१ |
| ५१ | „ सदाशिव लक्ष्मण | „ | २७९ |
| ५० | कै. दिनकर गोविंद यांचे स्मरणार्थ हस्ते श्री. भास्कर अनंत | | २८० |

| रु. | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५० | श्री. रामकृष्ण शंकर | वा. हि. | २४७ |
| ५० | ,, दत्तात्रय मोरेश्वर | ,, | २६९ |
| ५० | ,, मधुकर दत्तात्रय | ,, | ३१० |
| ५० | ,, अरविंद विश्वनाथ | ,, | १०८ |
| ५० | श्रीमती प्रमोदिनीबाई अनंत | ,, | २९६ |
| ५० | सौ. विजया जोग | ,, | २९६ |
| ५० | ,, नारायण गोविंद | वा. ऋ. | १६५ |
| ५० | ,, माधव हरि | ,, | ८२ |
| ५० | ,, मनोहर चिंतामण | ,, | ५१ |
| ५० | ,, मोरेश्वर सदाशिव | ,, | ९३ |
| ५० | ,, विनायक वामन | शां. | ८१ |
| ४५ | श्री. मुकुंद वामन | वा. हि. | २८८ |
| ४० | ,, पांडुरंग केशव | शां. | ५१ |
| ३० | श्रीमती इंदिराबाई वासुदेव | वा. ऋ. | ५३ |
| ३० | श्री. गणेश शंकर | ,, | १०८ |
| ३० | ,, मधुकर कृष्णाजी | वा. हि. | १६३ |
| ३० | ,, सुधाकर शिवराम | वा. हि. | ६३ |
| ३० | ,, वासुदेव दत्तात्रय | वा. हि. | २१५ |
| ३० | ,, प्रभाकर वासुदेव | वा. हि. | १३१ |
| ३० | ,, विष्णु गजानन | वा. हि. | २१३ |
| २६ | कॅप्टन माधव गोपाळ | शां. | ६० |
| २६ | श्री. पद्माकर शंकर | वा. ऋ. | ४२ |
| २५ | ,, अशोक बाळकृष्ण | ,, | ६१ |
| २५ | ,, द्वारकानाथ शंकर | ,, | ४२ |
| २५ | ,, आनंद सदाशिव | ,, | १५६ |
| २५ | ,, गजानन बाळकृष्ण | ,, | ४३ |



| रु. | नांव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २५ | श्री. शिवराम विश्वनाथ | वा. ऋ. | ३९ |
| २५ | ,, प्रभाकर सीताराम | ,, | १२४ |
| २५ | ,, वासुदेव गजानन | ,, | १३२ |
| २५ | ,, विष्णु महादेव | ,, | १२७ |
| २५ | ,, वसंत गणेश | ,, | ६१ |
| २५ | ,, नारायण श्रीधर आगरकर | ,, | २१४ |
| २५ | ,, केशव मोरेश्वर आघारकर | ,, | २१२ |
| २५ | ,, सुरेश गणेश | ,, | ६२ |
| २५ | ,, गोपाळ रामचंद्र | ,, | १२७ |
| २५ | ,, नीलकंठ वासुदेव | ,, | ५३ |
| २५ | ,, महेश्वर रघुनाथ | ,, | १५४ |
| २५ | ,, यशवंत हरि | ,, | ८२ |
| २५ | ,, आनंद शिवराम | ,, | ४० |
| २५ | ,, अनंत चिंतामण | ,, | ५० |
| २५ | ,, लक्ष्मण विष्णु | ,, | १५३ |
| २५ | ,, दिनकर रघुनाथ | ,, | ४६ |
| २५ | ,, किशोर शिवराम | ,, | ४० |
| २५ | ,, मनोहर कृष्ण | ,, | ११९ |
| २५ | ,, विष्णु रघुनाथ आगरकर | ,, | २२३ |
| २५ | ,, केशव सदाशिव | ,, | १०६ |
| २५ | ,, रामचंद्र महादेव वर्तक | ,, | १९१ |
| २५ | ,, मधुसूदन केशव | वा. हि. | १८३ |
| २५ | ,, मोरेश्वर विनायक | ,, | १६० |
| २५ | ,, दिनकर महादेव | ,, | २१२ |
| २५ | ,, गणेश काशिनाथ | शां. | ८३ |
| २५ | ,, यशवंत काशिनाथ | ,, | ८३ |

| रु. | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २५ | श्री. भास्कर विठ्ठल | वा. हि. | १८१ |
| २५ | „ रमेश अनंत | „ | ३१२ |
| २५ | „ विनायक विठ्ठल | „ | १३२ |
| २५ | „ चिंतामण विष्णु | शां. | ४७ |
| २५ | डॉ. गंगाधर सिद्धनाथ | वा. हि. | २४३ |
| २५ | श्री. वासुदेव गोविंद | शां. | ४८ |
| २५ | „ दत्तात्रय विनायक | वा. हि. | २२३ |
| २५ | „ गणेश मुकुंद | „ | २३४ |
| २५ | „ दत्तात्रय नारायण | „ | २८६ |
| २५ | „ सुरेश वासुदेव | „ | १६२ |
| २५ | „ वसंत विनायक | „ | ३४० |
| २५ | „ शंकर लक्ष्मण | „ | १४६ |
| २५ | „ वासुदेव परशुराम | „ | १६२ |
| २५ | „ श्रीकांत त्रिंबक | संकीर्ण | ७९ |
| २५ | „ विनायक रामचंद्र | शां. | ७० |
| २५ | „ भिकाजी रामचंद्र | „ | ७२ |
| २५ | „ त्रिंबक रामचंद्र | „ | ७२ |
| २५ | „ सिताराम भालचंद्र | वा. हि. | ६८ |
| २५ | „ नरहर महादेव | „ | २२८ |
| २५ | „ विनायक बाळकृष्ण | शां. | ६० |
| २५ | „ अनंत रामचंद्र | वा. हि. | २९० |
| २५ | „ मधुकर गंगाधर | „ | १३४ |
| २५ | „ श्रीनिवास पुरुषोत्तम | „ | ८६ |
| २५ | „ माधव पुरुषोत्तम | „ | ८६ |
| २५ | „ शंकर कृष्णाजी | „ | १०५ |
| २५ | „ श्रीपाद सीताराम | „ | १३३ |



| रु. | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २५ | श्री. नारायण मोरेश्वर | वा. हि. | ९५ |
| २५ | „ शंकर नारायण | „ | ३३४ |
| २५ | „ गोपाळ जनार्दन | „ | १०६ |
| २५ | „ शंकर जनार्दन | शां. | ५४ |
| २५ | „ गोविंद विनायक | वा. हि. | १९२ |
| २५ | „ मनोहर रघुनाथ | „ | १८४ |
| २५ | „ कृष्णाजी रामचंद्र | „ | ३३६ |
| २० | „ मोरेश्वर सखाराम | शां. | ४९ |
| २० | „ भालचंद्र गोपाळ | „ | ६१ |
| २० | „ मुकुंद चिंतामण | वा. ऋ. | ५२ |
| ११-२५ | „ गंगादास विश्वनाथ इंदूर | „ | ८१ |
| ११ | „ विजय दत्तात्रय | , | १३७ |
| ११ | „ मधूकर दिनकर | वा. हि. | २१६ |
| ११ | „ शांताराम शंकर | शां. | १६ |
| १० | श्री. चिंतामण गणेश | वा. हि. | २४४ |
| १० | „ दत्तात्रय शंकर | शां. | १६ |
| १० | „ पुरुषोत्तम रामचंद्र | वा. हि | १८२ |
| १० | „ दिगंबर मोरेश्वर | वा. ऋ. | ८० |
| १० | „ रामचंद्र गोविंद | „ | १०५ |
| १० | „ बाळकृष्ण महादेव वर्तक | „ | १९१ |
| १० | „ त्रिंबक भार्गव | „ | ८९ |
| १० | „ अनंत लक्ष्मण | वा. हि. | ३२७ |
| १० | „ अनंत दिनकर | „ | २१८ |
| १० | „ वसंत व हरि गोविंद | „ | १३० |
| १० | „ गणेश रामचंद्र | „ | ३२७ |
| १० | „ व्यंकटेश रामराव | क. | ४१ |

| रु. | नाव | गोत्र | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १० | ,, रामचंद्र नीलकंठ | वा. हि. | १५८ |
| १० | ,, काशिनाथ नारायण | शां. | ३२ |
| ५ | ,, राजाराम गोविंद | वा. हि. | २६६ |
| ५ | ,, अनंत विनायक | वा. ऋ. | ११४ |

एकुण रु. १६७४७–७५

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री. सदाशिव दत्तात्रय | वा. हि. | २१५ |
| ३० | ,, सतीश मोरेश्वर. | ,, | २४६ |

## शुद्धिपत्र

पृ. ४० श्री. यशवंत विठ्ठल व वसंत विठ्ठल देणगी रक्कम रु. १००१ ऐवजी १०००.

पृ. ४३ श्री. काशीनाथ भास्कर रु. ५१ ऐवजी ५० रु.

पृष्ठ ४६ ,, दत्तात्रय विनायक रु. २५ ऐवजी २० रु.

पृष्ठ ४६ ,, गणेश मुकुंद रु. २५ ऐवजी २० रु.

रु. १६७७०–७५ ग्रंथप्रकाशन व फोटोसाठी एकूण जमा (दि. ३१–१–१९७४ पर्यंत)

पृष्ठ ४३ रु. ७० डॉ. हरिकृष्ण महादेव ऐवजी डॉ. हरिकृष्ण माधव.

पृष्ठ ४४ रु. ३० श्री मधुकर कृष्णाजी ऐवजी श्री. मधुसूदन कृष्णाजी
पृ. वा. हि. १६३ पृ. वा. हि २३०

पृष्ठ ४६ रु. २५ श्री. दत्तात्रय विनायक पृ. वा.हि. २२३ ऐवजी ३२३

शांडिल्य पृ. ८१ ओळ १४
आशिष विश्वनाथ (१०) ऐवजी निखिल विश्वनाथ (१०) वाचावे.



आमच्या दातार कुटुंबियाना सदिच्छा

मराठे टेक्स्टाईल मिल्स
मिरज (जिल्हा सांगली)
महाराष्ट्र राज्य

कार्डेड व कोम्ब्ड
तलम व अति तलम
सुताचे उत्पादक

दूरध्वनी--मिरज २९१ [५ लाइन्स]
मुंबई २६८६९५.

VEEDOL AUTOMOTIVE
&
INDUSTRIAL LUBRICANTS

Tide Water Speciality Products,

MUKUND INDUSTRIAL WORKS
Ichalkaranji & Kolhapur